


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०३ ● अंक : ०७२ ● पुणे ● सोमवार, दि. २४ नोव्हेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

# सफाई कर्मचाऱ्यांना दीडपट वेतन

● सर्वसाधारण सभेची मंजुरी; पुणे महापालिकेच्या साडेसात हजार कर्मचाऱ्यांना दिलासा ●



## धुळीकणांमुळे नागरिक त्रस्त

खडकवासला –सिंहगड रोड परिसरातील वाढत्या धुळीकणांमुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत असून आरोग्यविषयक तक्रारींमध्येही वाढ होत आहे. याबाबत स्थानिक नागरिकांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे अधिकारी श्री. संदीप कदम यांना तातडीने कृतीची मागणी केली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, "छोट्या-मोठ्या कारणांवर आम्हाला त्वरित दंड कारवाई केली जाते. पण संपूर्ण सिंहगड रोडवर मोठ्या प्रमाणावर धूळ पसरवणाऱ्या, रस्त्यांचे काम अपूर्ण ठेवणाऱ्या व वाहतुकीदरम्यान हवा प्रदूषण करणाऱ्यांवर कारवाई कधी होणार? याचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे."

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी काम करणाऱ्या पुणे महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांना आता त्या दिवसाचे दीडपट वेतन मिळणार आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत हा महत्त्वाचा निर्णय मंजूर करण्यात आला असून सुमारे ७,५०० सफाई कर्मचाऱ्यांना याचा थेट लाभ होणार आहे.

राज्य सफाई कर्मचारी आयोगाच्या बैठकीत पुणे महापालिकेकडून सफाई कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्यांबाबत माहिती मागवण्यात आली होती. सुट्ट्या न देणे किंवा सुट्टीच्या दिवशी काम करूनही मोबदला न मिळाल्याबाबत अनेक तक्रारी आयोगापुढे मांडण्यात आल्या होत्या. या दाखल तक्रारींची चौकशी केल्यानंतर त्यात तथ्य आढळून आले.

यानंतर आयोगाने सर्व शासकीय सुट्ट्या, तसेच दर महिन्याचा दुसरा आणि चौथा शनिवार हे दिवस सफाई कर्मचाऱ्यांना सुट्टी देण्याचे निर्देश दिले होते. मात्र सफाई विभागाचे कामकाज सातत्याने सुरू ठेवावे लागल्याने पाच दिवसांचा आठवडा लागू करणे शक्य नसल्याचे महापालिकेने स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर सुट्टीच्या दिवशी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त मोबदला देण्याचा पर्याय स्वीकारण्यात आला आणि त्यानुसार दीड दिवसाचे वेतन देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने मंजूर केला होता. सर्वसाधारण सभेनेही या प्रस्तावास अंतिम मंजुरी दिली आहे.

या निर्णयामुळे महापालिकेच्या वेतन खर्चात साडेतीन ते चार कोटी रुपये इतकी वार्षिक वाढ होणार असली, तरी सफाई कर्मचाऱ्यांच्या हक्कांना मिळणारे संरक्षण आणि त्यांच्या श्रमांची दखल घेणारा हा सकारात्मक निर्णय मानला जात आहे.

# पुणे महापालिकेत उपायुक्तांच्या पुन्हा बदल्या

## १२ दिवसांत अविनाश सपकाळ यांची दोनदा बदली : अधिकाऱ्यांमध्ये धास्ती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेत उपायुक्तांच्या बदल्यांचे सत्र सुरूच आहे. दोन आठवड्यांपूर्वीच मोठ्या प्रमाणात बदल्या झाल्यानंतर आयुक्त नवल किशोर राम यांनी पुन्हा एकदा उपायुक्तांच्या नव्या बदल्या जाहीर केल्या आहेत. विशेष म्हणजे, उपायुक्त अविनाश सपकाळ यांची अवघ्या १२ दिवसांत दुसऱ्यांदा बदली करण्यात आली आहे.

नव्या आदेशानुसार, सपकाळ यांच्याकडून मोटारवाहन विभाग काढून घेऊन त्यांना घनकचरा व्यवस्थापन विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. तर संदीप कदम यांना मोटारवाहन विभागाचे कामकाज सोपवण्यात आले आहे. घनकचरा विभाग मिळावा या प्रयत्नात गुंतलेल्या काही अधिकाऱ्यांना आयुक्तांनी



दिलेला हा अनपेक्षित 'झटका' मानला जातो.

नवल किशोर राम यांनी आयुक्तपद स्वीकारल्यानंतर प्रशासनात शिस्त आणण्यावर भर दिला आहे. चुकीच्या पद्धतीने पोस्टिंग मिळवण्याच्या प्रयत्नांना त्यांनी स्पष्ट आवर घातल्याचे दिसत आहे. राज्य शासनाने अलीकडेच काही अधिकारी प्रतिनियुक्तीवर पाठवल्यानंतर महापालिकेत मोठ्या प्रमाणावर बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यावेळीही काही अधिकाऱ्यांनी क्रीम पोस्टसाठी प्रयत्न केले होते, मात्र आयुक्तांनी ते प्रयत्न धुडकावल्याची माहिती समोर आली होती.

याच पार्श्वभूमीवर, दोन दिवसांच्या अंतराने दोन स्वतंत्र आदेश काढून अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये फेरबदल केले होते. त्या वेळी घनकचरा व्यवस्थापन विभागात बदल झाला नव्हता.

पाच महिन्यांपूर्वीच अविनाश सपकाळ यांची मिळकतकर विभागातून बदली करून त्यांना मोटर वाहन विभाग देण्यात आला होता. मात्र घनकचरा व्यवस्थापन विभाग मिळावा यासाठी महापालिकेतील तसेच शासनातील काही अधिकाऱ्यांनी दबाव आणल्याची चर्चा होती.

काही अधिकाऱ्यांनी या बदल्यांसाठी मुंबईतील मंत्र्यांकडेही पाठपुरावा केल्याची माहिती समोर येत आहे. यामुळे प्रशासनातील शीतयुद्ध चव्हाट्यावर आले होते.





## ठळक बातम्या

### बहिणीचा लाडका भाऊ हे मोठे पद

फुरसुंगी (आरंभ पर्व) : सत्ता येते आणि सत्ता जाते. मात्र मला लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ हे सगळ्या पदांपेक्षा मोठे आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाची मनात असलेली खदखद रविवारी (दि. २३) फुरसुंगी येथे बोलून दाखवली. फुरसुंगी उरुळी देवाची नगरपरिषदेसाठी शिवसेना उमेदवाराच्या प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी आमदार विजय शिवतारे, माजी आमदार रवींद्र धंगेकर आदी उपस्थित होते. यावेळी शिंदे म्हणाले की, आपण मुख्यमंत्री झाल्यावर फुरसुंगी-उरुळी गाव येथील महापालिकेच्या अवाजवी करामुळे नगरपरिषद करण्यात आले. अडीच वर्षांच्या कालावधीत बहिणींसाठी मुख्यमंत्री लाडकी योजना आणली. मी टीकेला टिकेतून उत्तर न देता कामातून उत्तर देत असल्याचे त्यांनी सांगितले. फुरसुंगी आणि उरळी देवाची ही दोन गावे पुणे महानगरपालिकेतून वगळून त्यांची स्वतंत्र नगर परिषद स्थापन करण्याचा निर्णय मी माझ्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात घेतला. आमदार विजयबापू शिवतारे यांनी त्यासाठी आग्रही मागणी केली होती, कार्यकर्त्यांची ही मागणी पूर्ण करून स्थानिक नागरिकांचा १२ पट कराच्या बोज्यातून आम्ही मुक्तता केली. तसेच या भागाचा पाणीप्रश्न कायमचा मार्गी लावण्यासाठी २५ कोटींची पाणीपुरवठा योजना मंजूर केली. ज्यांनी या दोन्हीला विरोध केला त्यांना आता तुमची मते मागण्याचा अजिबात अधिकार नाही, त्यामुळे त्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी असे आवाहन यावेळी शिंदे यांनी केले.



# श्रमेव जयते

पंतप्रधान नरेंद्र मोदी यानी संसदेत श्रम संहितेला मंजुरी देऊन भारतातील ४० कोटी कामगारांना त्यांच्या श्रमांचा लाभ मिळवून दिला आणि प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. या सुधारणा स्वतंत्र भारतातील सर्वात मोठ्या आणि परिवर्तनकारी असल्याचे सांगण्यात येत आहेत. या नव्या सुधारणा वसाहतवादी काळातील म्हणजे कालबाह्य आणि निरूपयोगी झालेल्या ब्रिटिश राजवटीतील कामगार कायद्यांची जागा घेतील. भारताला विकसित देश बनवण्याच्या दृष्टीने या नव्या सुधारणा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. ट्रेड युनियन्स आणि डाव्या प्रणित पक्षाच्या कामगार संघटना सोडल्या, तर बहुतेक सर्वांनी या सुधारणांचे स्वागत केले आहे. कारण या सुधारणेमुळे आर्थिक लाभाबरोबरच कामागारांना सुरक्षाही देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. यामुळे लिंगभेद पूर्णपणे संपुष्टात आला आहे. लिंगभेद आता संपुष्टात आल्याचे जाहीर होत असून, देशभरातील लाखो महिलांच्या दृष्टीने या सुधारणा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. एमएसएमई म्हणजे लघू, सूक्ष्म व मध्यम उद्योग क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. देशातील जवळपास एक पंचमांश एमएसएमई उद्योगांचे नेतृत्व महिलांकडे आहे. या महिला उद्योजकांना अधिक सामर्थ्य व संधी देण्यासाठी या सुधारणा 'नारीशक्ती'चा खरा सन्मान करतात.

या कोडमुळे महिला कामगारांची उत्पादकता वाढेल, कार्यक्षेत्रात त्यांना अधिक संधी मिळेल आणि सामाजिक न्यायाची भक्कम पायाभरणी होईल. हे या सुधारणांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. आतापर्यंत ही नियमावली अनेक क्षेत्रांत पाळली जात नसे; मात्र आता असा भेदभाव चालणार नाही. महिलांना समोर ठेवून हे कोड तयार करण्यात आले असले तरीही सर्व कामगारांना आणि देशातील कामगारशक्तीचा विचार करण्यात आला आहे. नव नियुक्तांना नियुक्तीपत्रे देण्याची तरतूद, महिलांसाठी कामाचे तास निश्चित करणे आणि वेतन वेळेवर देणे, कामावर अपघात झाला, तर त्याची पूर्ण भरपाई देणे आणि कामगार वर्गाची प्रतिष्ठा वाढवणे हा लेबर कोडचा उद्देश आहे. हे नवीन लेबर कोड का आणावे लागले मागे एक विचार आहे. तो म्हणजे जे लेबर म्हणजे कामगारविषयक कायदे होते ते सर्व कालबाह्य झाले आहेत आणि ते ब्रिटिश काळातील होते. त्यामुळे त्यामध्ये व्यापक सुधारणा करणे काळाची गरज बनली होती. या नव्या कोडचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांना आता रात्रपाळीत काम करण्याची तसेच धोकादायक व जड यंत्रसामग्री हाताळणाऱ्या क्षेत्रात, जसे की खाणकाम, अशा ठिकाणी काम करण्याची औपचारिक परवानगी देण्यात आली आहे. मात्र, यासाठी संबंधित महिलांची स्पष्ट संमती आवश्यक असेल आणि त्यांच्या सुरक्षेसाठी कडक उपाययोजना बंधनकारक असतील. यामुळे लिंगाधिष्ठित भेदभाव दूर करण्याचा ठोस प्रयत्न केला गेला आहे. तसेच तक्रार निवारण समित्यांमध्ये महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल, अशी तरतूद करण्यात आली आहे. या कोडद्वारे प्रत्येक कामगाराला सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याची तरतूद करण्यात आली आहे, हे त्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. याशिवाय, सर्व कामगारांसाठी ईएसआयसीचे दरवाजे खुले करण्यात आले आहेत. एकच कामगार जरी धोकादायक कामात गुंतलेला असेल, तरीही त्याला ईएसआयसीचा संपूर्ण लाभ मिळणार आहे.

या कोडचे सर्वात वैशिष्ट्य म्हणजे गिग कामगार म्हणजे स्विगी किंवा ओला, उबेर यासारख्या कामगारांनाही इएसआयसीचाचा लाभ मिळेल. त्यांना यापूर्वी असे लाभ दिले जात नव्हते. वेतन संहिता,औद्योगिक संबंध संहिता आणि सामाजिक सुरक्षा संहिता या सर्वांना एकत्रित करून हा लेबर कोड तयार करण्यात आला आहे. सरकारने या



कोडद्वारे 'इज ऑफ डुइंग बिझीनेस'ला चालना दिली असली तरीही काँग्रेसने नेहमीच्या सवयीप्रमाणे सरकारच्या प्रत्येक निर्णयावर टीका करण्याच्या प्रथेला जागून याही निर्णयावर टीका केली आहे. हे कायदे कामगारांच्या मागण्या लक्षात न घेता लागू केले असून राष्ट्रीय किमान वेतन, नागरी रोजगार हमी आणि सार्वत्रिक आरोग्य कवचाचा लाभ यापासून कायदे वंचित आहेत, असे काँग्रेसने म्हटले आहे. काँग्रेसने हे कायदे म्हणजे भांडवलशाहीला पोषक असून त्यामुळे त्यांना हवे तेव्हा कुणालाही काढता येणार आहे असे म्हटले आहे. अर्थात हे खरे आहे की, ले ऑफची तरतूद १०० वरून ३०० करण्यात आली आहे आणि यामुळे पूर्वी जी शंभर कामगार असलेल्या कंपन्या बंद करण्याची परवानगी सरकारकडून घ्यावी लागत असे त्याला आता ३०० कामगार असणे गरजेचे आहे. काँग्रेसने अशी टीका केली आहे की, या कोडमध्ये हायर अॅण्ड फायर राजवटीला चालना मिळेल, पण काँग्रेसने यापेक्षाही कामगारविरोधी कायदे आणले होते. त्यामुळे आता या कोडविरोधात तक्रारीचा सूर लावणे म्हणजे केवळ भाजपविरोधात काही करता येणे शक्य नाही म्हणून गळे काढणे आहे.

काँग्रेस आणि ट्रेड युनियन्स यांचा या नव्या कोडला विरोध आहे. कारण दोन्ही सत्तेतून बाहेर आहेत आणि ट्रेड युनियन्स, तर डाव्यांच्या आहेत. काँग्रेस सरकार डाव्यांच्या ओंजळीतून पाणी पित होते, तेव्हा डाव्यांची मनमानी चालत होती. पण आता मोदी सरकारने डाव्यांचे अस्तित्व संपवले आहे आणि त्यामुळे डाव्यांची पोटदुखी सुरू आहे. नवी संहिता ही लोकशाहीविरोधी आहे असे डाव्या संघटनांनी म्हणणे म्हणजे विनोद आहे, कारण डाव्यांची लोकशाही पालन करण्याची ख्याती नाही. अर्थात सर्वच कामगार कांग्रेसच्या विचारांवर चालणारे नाहीत. त्यांनी या नव्या सुधारणांना पाठिंबा दर्शवला आहे आणि मोदी सरकारची प्रशंसा केली आहे. यात सर्वात महत्वाचे म्हणजे अर्थतज्ज्ञांनी मोदी सरकारची संहिता अल्पकालीन आव्हानांना सामोरी जाणारी आहे पण दीर्घकालीन आर्थिक गेन म्हणजे देणारी आहे असे मत व्यक्त केले आहे. या कोडमुळे आर्थिक वाढीला चालना मिळणार असून रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणात होणार आहे. हा एक मोठा फायदा आहे. तसेच रोजगार निर्मितीही अत्यंत स्पर्धात्मक वातावरण आणि स्वयंपूर्ण राष्ट्रात होणार आहे अशी भावना व्यक्त केली आहे. या कोडमुळे 'इज ऑफ डुइंग बिझीनेस' तयार होणार आहे आणि हेच मोदी सरकारचे अंतिम उद्दिष्ट आहे.

# तृतीयपंथीयांनाही मन असतं; समाजाच्या स्वीकाराची अजूनही प्रतीक्षा

**शब्दांकन : प्रतिक गंगणे**
**संकलन : लक्ष्मण साबळे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा आणि समान हक्क मिळवण्याचा अधिकार आहे. मात्र तृतीयपंथीय समुदायासाठी ही मूलभूत गोष्ट आजही संघर्षमय वास्तव ठरते. "तृतीयपंथीयांनाही मन असतं" या भावनेचा समाजाने केवळ उच्चार न करता प्रत्यक्ष स्वीकृती देणे गरजेचे असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. कुटुंबाकडून होणारा तिरस्कार, शिक्षणात होणारा भेदभाव, रोजगाराच्या संधींचा अभाव, आरोग्यसेवा आणि सामाजिक स्वीकार या सर्वच पातळ्यांवर तृतीयपंथीयांना अडथळे येतात. अनेकांना अल्पवयातच घराबाहेर काढण्यात येते. भावनिक आधार, सुरक्षितता आणि ओळख मिळवण्याची धडपड त्यांच्या जिवनातील सर्वात मोठी लढाई ठरते.



समाजातील चुकीच्या समजुती, उपहासात्मक दृष्टिकोन आणि भेदभावामुळे अनेक तृतीयपंथीय मानसिक तणाव, नैराश्य आणि एकाकीपणाचा सामना करतात. काहींचे जगणे भीक मागणे, नाच-गाणे अथवा लैंगिक अत्याचाराच्या जोखमीशी जोडले जाते. शिक्षण आणि रोजगार मिळाले तर ते सक्षमपणे स्वावलंबी होऊ शकतात, परंतु संधींचा अभाव त्यांच्या प्रगतीला अडथळा ठरतो.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने 2014 मध्ये तृतीयपंथीयांचे स्वतंत्र लिंग म्हणून अस्तित्व मान्य केले असले, विविध सरकारी योजना अस्तित्वात असल्या तरी त्याचा प्रत्यक्ष लाभ कमी प्रमाणात नागरिकांपर्यंत पोहोचतो, अशी टीका सामाजिक कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.

समाजाने तृतीयपंथीयांकडे दया किंवा विनोदाचा विषय म्हणून नव्हे, तर समान हक्क असलेल्या मानव म्हणून पाहण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. शिक्षणाची संधी, रोजगार निर्मिती, सन्मानपूर्वक आरोग्य सेवा आणि सुरक्षित सामाजिक वातावरण उपलब्ध करून दिल्यास तृतीयपंथीय समुदाय मुख्य प्रवाहात येऊ शकतो, असा तज्ज्ञांचा विश्वास आहे.

समानता आणि मानवतेवर आधारित समाज निर्माण करण्यासाठी तृतीयपंथीयांचा स्वीकार आवश्यक असल्याचे मत सामाजिक संघटनांकडून व्यक्त करण्यात येत असून, "तृतीयपंथीयांनाही मन असतं" ही भावना समाजाच्या विचारांमध्ये आणि वर्तनात उतरवण्याची गरज अधोरेखित होत आहे.

## समाजाने काय करणे गरजेचे आहे?

**तृतीयपंथीयांसाठी सहानुभूती दाखवणे पुरेसे नाही; त्यांना संधी देणे आवश्यक आहे.**

**१. शिक्षणाची संधी**
**शाळा-कॉलेजांमध्ये सुरक्षित वातावरण**
**प्रवेशात भेदभाव नाही**
**शिक्षणासाठी विशेष मदत**

**२. रोजगार**
**सरकारी व खाजगी क्षेत्रात रोजगार आरक्षण**
**कौशल्य विकास प्रशिक्षण**
**स्वरोजगारासाठी मदत**

**३. आरोग्यसेवा**
**वेगळे उपचार नव्हे तर समान, सन्मानपूर्वक सेवा**
**मानसिक आरोग्य सहाय्यता**

**४. सामाजिक स्वीकार**
**उपहास थांबवणे**
**आदराने संबोधणे**
**त्यांना समाजाचा भाग मानणे**

# आरोग्यदायी आहारासाठी नवीन क्रॉम्प्टन अमिओ एअर फ्रायर्स

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

आरोग्यदायी आहार आणि स्वादिष्ट कुरकुरीत खाद्यपदार्थांमधून एकाची निवड करण्याची दुविधा आता संपली आहे. ग्राहकांना दीर्घकाळापासून आरोग्यासाठी स्वादाबाबत तडजोड करावी लागत आहे किंवा परिपूर्ण कुरकुरीतपणासाठी अतिरिक्त तेलाचा वापर करावा लागत आहे. हे आव्हान ओळखत क्रॉम्प्टन ग्रीव्ह्ज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लि. या भारतातील घरगुती नाविन्यतेमधील विश्वसनीय कंपनीने अमिओ एअर फ्रायर सिरीज लाँच केली आहे, ज्यासह प्रत्येक आधुनिक किचनसाठी आरोग्यदायी पर्याय सोपे केले आहेत. क्रॉम्प्टनच्या भरवसा व विश्वसनीयतेच्या वारसावर डिझाइन करण्यात आलेली नवीन अमिओ श्रेणी या तडजोडीसाठी



दीर्घकालीन सोल्यूशन देते, तसेच प्रत्येक आहार आरोग्यदायी, कुरकुरीत आणि सहजपणे बनवता येणारा असण्याची खात्री देते. पारंपारिकरित्या अधिक तळण्याच्या पद्धतींमध्ये अतिरिक्त तेलाचा वापर केला जातो व शरीरातील फॅट्स वाढतात, तसेच आहार बनवण्यासाठी वेळ देखील लागतो आणि किचनमध्ये अस्वच्छता वाढते.

# फक्त दोन महिन्यांचे अॅडव्हान्स, मनमानी भाडेवाढीवर लगाम

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

देशभरातील भाडे बाजारातील मनमानीला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने 'नवीन भाडे करार २०२५' संदर्भातील नवे नियम लागू केले आहेत. या नियमांमुळे घरमालक आणि भाडेकरू यांच्यातील वाद मोठ्या प्रमाणात कमी होतील, तसेच भाड्यानं राहण्याची प्रक्रिया पारदर्शक आणि सुरक्षित बनणार आहे. नवीन नियमानुसार प्रत्येक भाडे कराराची नोंदणी २ महिन्यांच्या आत करणे अनिवार्य करण्यात आली असून, तसे न केल्यास ५ हजार रुपयांचा दंड आकारला जाणार आहे.

पूर्वी बंगळुरूसह अनेक शहरांमध्ये घरमालक अॅडव्हान्स म्हणून एका वर्षाच्या भाड्याइतकी रक्कम घेत असल्याने वाद आणि




आर्थिक ताण निर्माण होत होता. आता त्यावर मर्यादा घालण्यात आली आहे.

**भाडेकरूंना मोठा दिलासा**

* सिक्युरिटी डिपॉझिट : राहत्या घरासाठी घरमालक फक्त २ महिन्यांच्या भाड्याइतकीच रक्कम जामीन म्हणून घेऊ शकणार.
* भाडेवाढ नियंत्रण : भाडे वाढवण्यापूर्वी घरमालकाने भाडेकरूला नोटीस देणे बंधनकारक आहे. त्यामुळे अचानक किंवा मनमानी भाडेवाढ होणार नाही.
* घर रिकामं करण्याची सक्ती नाही : योग्य कायदेशीर प्रक्रिया आणि नोटीसशिवाय भाडेकरूला घरातून बाहेर काढता येणार नाही.

**घरमालकांनाही दिलासा**

* थकबाकी कारवाई : सलग ३ महिने किंवा त्याहून अधिक काळ भाडे न भरल्यास घरमालक प्रकरण विशेष ट्रिब्युनलकडे नेऊ शकतो.
* वाद निवारण जलदगतीने : भाडेकराराशी संबंधित तक्रारींची सोडवणूक करण्यासाठी विशेष ट्रिब्युनल स्थापन करण्यात आले असून वाद ६० दिवसांत निकाली काढण्याचे उद्दिष्ट आहे.
* करसवलत : भाड्यावर टीडीएस कपातीची मर्यादा वाढवून ६ लाख रुपये करण्यात आली आहे, ज्यामुळे घरमालकांच्या हातात अधिक रक्कम उपलब्ध राहणार आहे.

**भाडे करार नोंदवण्यासाठी संबंधित राज्याच्या मालमत्ता नोंदणी पोर्टलवर जाऊन घरमालक आणि भाडेकरू दोघांची ओळखपत्रे अपलोड करावी लागतील. भाड्याचे तपशील भरल्यानंतर ई-साइनद्वारे करार सबमिट करावा लागेल. यानंतर कराराची नोंदणी पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध होईल.**

## फिटनेस कोच मा. श्री. नरेंद्र आवटे

# फिटनेसचा कानमंत्र देणारा अवलिया

**प्रतिक गंगणे (दै. आरंभ पर्व)**

आजच्या आधुनिक, व्यस्त आणि तणावपूर्ण जीवनशैलीत 'फिटनेस' ही केवळ फॅशन न राहता आवश्यकता बनली आहे. कामाचा ताण, अनियमित आहार, झोपेची कमतरता, मोबाईल आणि स्क्रीनवर वाढलेला वेळ यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्याचे प्रश्न गंभीर रूप घेत आहेत. अशा काळात आरोग्यदायी जीवनशैलीची प्रेरणा देत, शेकडो लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे फिटनेस कोच मा. श्री. नरेंद्र आवटे. त्यांच्या सततच्या प्रयत्नांमुळे आरोग्यासाठी 'योग्य मार्गदर्शन' किती महत्त्वाचे आहे, याची जाणीव समाजात वाढली आहे.

नरेंद्र आवटे यांनी फिटनेसला केवळ शरीरसौष्ठव किंवा वजन कमी करण्यापुरते मर्यादित न ठेवता त्याला व्यापक आरोग्य चळवळीचे रूप दिले आहे.



ते नेहमी सांगतात -"फिटनेस म्हणजे शरीर सुडौल दिसणे नव्हे... तो श्वास, विचार, सवयी आणि जीवनशैली सुधारण्याचा प्रवास आहे."

याच विचारातून त्यांनी विविध वयोगटांसाठी वेगवेगळे प्रशिक्षण मॉड्यूल विकसित केले आहेत.

त्यात प्रमुखतः —

- वजन संतुलन आणि फॅट लॉस
- डायबेटीस, बी.पी., थायरॉईड रुग्णांसाठी सुरक्षित व्यायाम पद्धती
- वरिष्ठ नागरिकांसाठी सांधेदुखी-कंबरदुखी प्रतिबंधक व्यायाम
- महिलांसाठी विशेष फिटनेस कार्यक्रम
- विद्यार्थ्यांसाठी स्टॅमिना व एकाग्रता वाढविणारे प्रशिक्षण
- क्रीडापटूंसाठी परफॉर्मन्स ट्रेनिंग

या उपक्रमांमुळे अनेकांनी आपल्या आरोग्यात लक्षणीय सुधारणा अनुभवली आहे.

**मानसिक आरोग्यावर विशेष लक्ष :** आजच्या तरुण पिढीत तणाव, नैराश्य, चिंता, अनिद्रा यांचे प्रमाण वाढत आहे. हे ओळखून आवटे यांनी 'माईंडफुल फिटनेस' या संकल्पनेची मांडणी केली आहे.

यामध्ये श्वसनक्रिया, ध्यान, प्राणायाम, रिलॅक्सेशन थेरपी, यांचा समावेश करून मन आणि शरीरातील समतोल साधण्यावर भर दिला जातो.

**आरोग्य जनजागृतीची मोहिम :** फिटनेस कोचिंगपुरते कार्य न ठेवता त्यांनी समाजातील सर्व स्तरांपर्यंत आरोग्याचा कानमंत्र पोहोचवण्याचे ध्येय ठेवले आहे.

त्यांनी शाळा-महाविद्यालयांत, महिला बचतगटांमध्ये, कॉर्पोरेट संस्थांमध्ये, सामाजिक मंचांवर, आरोग्य व फिटनेस विषयक मार्गदर्शन शिबिरे, कार्यशाळा आणि मोफत जनजागृती उपक्रम राबवले आहेत.

**परिणामकारक कार्याचा ठसा :** आवटे यांच्या प्रशिक्षणामुळे अनेक जणांनी — अनावश्यक वजन कमी केले, औषधांवरील अवलंबित्व कमी केले, जीवनशैलीत शिस्त आणली, आत्मविश्वास व उत्साह वाढवला, व्यायामाची सातत्यपूर्ण सवय लावली

त्यांच्या मार्गदर्शनाचा प्रभाव केवळ शारीरिक बदलांपुरता नसून व्यक्तिमत्त्व घडविण्यातही महत्त्वाचा असल्याचे मत प्रशिक्षार्थी व्यक्त करतात.

**समाजासाठी सेवाभाव**

नरेंद्र आवटे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठळक पैलू म्हणजे त्यांचा साधा, जमिनीवरचा व सेवाभावी स्वभाव. फिटनेस हा सर्वांसाठी उपलब्ध व्हावा, या उद्देशाने ते आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सवलतीच्या किंवा मोफत फिटनेस सत्रांचे आयोजन करतात.

नरेंद्र आवटे यांचे समर्पण, ज्ञान, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळे ते खऱ्या अर्थाने "फिटनेसचा कानमंत्र देणारा अवलिया" म्हणून सर्वत्र परिचित झाले आहेत. आधुनिक समाजाला आरोग्यदायी जीवनशैलीची दिशा देण्याच्या त्यांच्या या कार्याला व्यापक दाद मिळत असून आगामी काळात त्यांचा हा उपक्रम अधिक प्रभावीपणे विस्तारेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### विवाहित महिला बेपत्ता; २२ दिवस उलटूनही पोलिसांचा शोध लागेना



**खेड शिवापूर (ता. हवेली) (आरंभ पर्व) : खेड शिवापूर येथील लैला छगन वाघमारे (वय ३०) ही विवाहित महिला मागील २२ दिवसांपासून बेपत्ता असून राजगड पोलिस स्टेशनकडून अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्यामुळे कुटुंबीयांमध्ये तथा परिसरात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.लैला वाघमारे या ६.३० वाजता "भाजी घेऊन येते" असे सांगून घरातून बाहेर पडल्या; परंतु त्यानंतर त्या घरी परतल्या नाहीत. रात्री उशिरापर्यंत शोध घेऊनही त्या न सापडल्याने शिवापूर पोलिस चौकीत तक्रार दाखल करण्यात आली. मात्र, २२ दिवस उलटूनही महिलेबाबत कोणताही ठावठिकाणा लागलेला नाही. दरम्यान, तिच्या तीन लहान मुलांचे हाल अधिकच भीषण झाले आहेत. धाकटा मुलगा फक्त २ वर्षांचा असून आईच्या वियोगाने सतत रडत असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. आर्थिक व मानसिक तणावामुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ येऊ लागली आहे. या संदर्भात सत्यशोधक बहुजन आघाडीचे संपर्क प्रमुख नागेश गायकवाड यांनी राजगड पोलिस स्टेशनवर तपासात झालेल्या दिरंगाईबद्दल तीव्र संताप व्यक्त केला. "पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवावी; अन्यथा पोलिस प्रशासनाविरोधात आंदोलन करण्याशिवाय पर्याय नाही," असा इशारा त्यांनी दिला. सदर घटनेमुळे परिसरात चिंतेचे वातावरण असून, नागरिक पोलिस प्रशासनाकडून तातडीची व संवेदनशील कार्यवाहीची मागणी करत आहेत.**

### मराठा आरक्षणाला गरज काय? उच्च न्यायालयात सवाल




**मुंबई (आरंभ पर्व) : मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (SEBC) म्हणून दिलेल्या 10 टक्के आरक्षणाच्या वैधतेवर दाखल याचिकेची आज मुंबई उच्च न्यायालयात सविस्तर सुनावणी झाली. या सुनावणीत आरक्षणाची आवश्यकता, मागासलेपणाचे निकष आणि मराठा समाजाची प्रत्यक्ष सामाजिक-आर्थिक स्थिती या महत्त्वाच्या मुद्द्यांवर तीव्र चर्चा झाली. याचिकाकर्त्यांचे वकील प्रदीप संचेती यांनी मराठा समाजाचे शासकीय नोकऱ्यांमधील विद्यमान प्रतिनिधित्व इतर समाजांच्या तुलनेत जास्त असल्याचे सांगत "जर आधीच प्रमाण लक्षणीय असेल, तर अतिरिक्त आरक्षणाची गरज काय?" असा सवाल न्यायालयासमोर उपस्थित केला. सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण अपुरे असल्याचा आरोप करत, समाज मागास असल्याचे सिद्ध करण्यासाठी आवश्यक असाधारण परिस्थितीचे निकष पूर्ण होत नसल्याचेही त्यांनी नमूद केले. इंदिरा साहनी प्रकरणातील 50 टक्क्यांच्या मर्यादेचा भंग केल्याचेही त्यांनी स्मरण करून दिले. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती रवींद्र घुगे, एन. जे. जमादार आणि संदीप मारणे यांच्या विशेष खंडपीठाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद संयतपणे ऐकून घेतले. न्यायालयाने या टप्प्यावर कोणतेही निरीक्षण नोंदवले नसले तरी राज्य सरकारला पुढील सुनावणीसाठी आवश्यक कागदपत्रे, आयोगाच्या शिफारसी आणि मराठा समाजाच्या सामाजिक-शैक्षणिक स्थितीचा तपशील सादर करण्याची सूचना केली आहे. राज्यातील लाखो विद्यार्थी, नोकरी इच्छुक तरुण आणि मराठा समाजाचे प्रतिनिधी या खटल्याकडे बारकाईने लक्ष ठेवून आहेत. कारण या निर्णयाचा परिणाम राज्यातील आरक्षण रचना, शैक्षणिक प्रवेश आणि नोकरभरती प्रक्रियेवर थेट होणार आहे. उच्च न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी 11 डिसेंबर रोजी दुपारी 3 वाजता घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.**

### ग्लोब एंटरप्राइझेस लिमिटेडचे दमदार दुसरी तिमाही निकाल

Globe Enterprises (India) Ltd.
Superior Quality

**मुंबई (आरंभ पर्व) : वस्त्र, डेनिम आणि होम टेक्सटाइल क्षेत्रातील अग्रणी कंपनी ग्लोब एंटरप्राइझेस (इंडिया) लिमिटेडने वित्तीय वर्ष 2025-26 च्या दुसऱ्या तिमाहीचे मजबूत आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. कंपनीने सप्टेंबर 2025 समाप्त तिमाहीत ऑपरेशनल स्तरावर प्रभावी कामगिरी केली असून महसूल आणि निव्वळ नफ्यात लक्षणीय वाढ नोंदवली आहे. कंपनीने सप्टेंबर-2025 समाप्त दुसऱ्या तिमाहीत ₹15,856.26 लाखांची आवक नोंदवली. जून-2025 तिमाहीतील ₹14,844.87 लाखांच्या तुलनेत ही 6.81 टक्क्यांची वाढ ठरली. तिमाहीचा करानंतर नफा (PAT) सप्टेंबर-2025 मध्ये ₹446.38 लाख झाला. जून-2025 मधील ₹139.52 लाखांच्या तुलनेत हा तब्बल 219.94% वाढ दर्शवतो. उच्च मार्जिन्स आणि सुधारित ऑपरेशनल कार्यक्षमतेमुळे नफ्यात ही जोरदार वाढ झाल्याचे कंपनीने स्पष्ट केले.**




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
सोमवार, दि. २४ नोव्हेंबर २०२५






# भाजपच्या सर्व २६ नगरसेवकांसह नगराध्यक्ष बिनविरोध

- नगर परिषदेच्या मतदाना आधीच भाजपचे ३ नगराध्यक्ष बिनविरोध निवडून आलेत.
- सोलापूर, अनगरनंतर आता दोंडाईचामध्ये भाजपनं बिनविरोध विजय मिळवलाय.
- मंत्री जयकुमार रावल यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढवण्यात आली.



**धुळे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील अनेक नगरपंचायती आणि नगरपरिषदांमध्ये कमळ फुलताना दिसत आहे. भाजपचे उमेदवार थेट बिनविरोध निवडून येऊ लागले आहेत. धुळ्यामधील दोंडाईचा नगरपरिषदेमध्ये सर्व २६ जागांवर भाजपचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. राज्याचे मंत्री जयकुमार रावल यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढवण्यात आली. नगरपरिषदेमधील संपूर्ण बिनविरोध ठरणारी दोंडाईचा नगरपरिषद ही राज्यातील पहिलीच नगरपरिषद ठरलीय. दोंडाईचा नगरपरिषदेच्या स्थापनेनंतर यंदा पहिल्यांदाच निवडणूक होणार होती. या ठिकाणी महाविकास आघाडीच्या सर्वच उमेदवारांनी त्यांचे अर्ज मागे घेतले. यामुळे नगराध्यक्षांसह सर्व २६ जागांवर भाजपाचे उमेदवार बिनविरोध निवडून आलेत. दोंडाईच्या नगराध्यक्षपदी मंत्री जयकुमार रावल यांच्या मातोश्री नयन कुमार रावल याही बिनविरोध निवडून आल्यात.

नगर पंचायत आणि नगर परिषदेच्या मतदाना आधीच भाजपचे तीन नगराध्यक्ष बिनविरोध निवडून आले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील अनगर नगरपंचायत, धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा आणि आता जळगाव जिल्ह्यातील जामनेर नगरपालिकेत अध्यक्षपदी भाजप नेत्यांची बिनविरोध निवड झालीय.

दोंडाईचा वरवाडे नगर परिषदेसाठी नगराध्यक्ष पदासाठी नयन कुवर रावल आणि महाविकास आघाडीच्या उमेदवार शरयू भावसार यांनी अर्ज दाखल केला होता. मात्र महाविकास आघाडीच्या उमेदवार शरयू भावसार यांच्या उमेदवारी अर्जावर भाजपकडून आक्षेप घेण्यात आला होता. शरयू भावसार यांचे वडील ॲड. एकनाथ भावसार यांची घरपट्टीची थकबाकी असल्याचे कारण पुढे करत त्यांचा उमेदवारी अर्ज बाद करण्यात आला. त्यानंतर शरयू भावसार यांच्या कुटुंबियांनी न्यायालयात धाव घेतली.



## बक्षीस वितरण व समारोप समारंभ संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
**विशाल भालेराव**

५१ वी कोल्हापुर परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा २०२५ आयोजित करण्याचा मान यावर्षी पुणे ग्रामीण पोलीस दलास मिळाला होता. या क्रीडा स्पर्धा दिनांक १७.११.२०२५ ते दि.२१.११.२०२५ या कालावधीमध्ये पोलीस उप मुख्यालय, बऱ्हाणपुर बारामती, पुणे ग्रामीण येथे संपन्न झाल्या. या क्रीडा स्पर्धेचा समारोप समारंभ परेड ग्राउंड पोलीस उप-मुख्यालय, बऱ्हाणपुर, बारामती पुणे ग्रामीण याठिकाणी दि.२१.११.२०२५ रोजी पार पडला. ५१ व्या कोल्हापुर परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धा २०२५ समारोप समारंभ प्रसंगी मा.श्री.दीपक शिवानंद पाण्डेय (भा.पी.से) अप्पर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस दळणवळण, माहीती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर मा.श्री. सुनील फुलारी (भा. पो.से) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र, कोल्हापुर हे कार्यकमाचे अध्यक्षीय स्थान भुषविले.




## आदित्य वायकर बनला सीए

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**
**विशाल भालेराव**

सिंहगड–खानापूर विभागात कार्यरत असलेल्या वनविभागाचे वनरक्षक श्री. वायकर भाऊसाहेब यांच्या चिरंजीव आदित्य बळीराम वायकर यांनी अतिशय प्रतिष्ठेची समजली जाणारी चार्टर्ड अकाउंटंट (C.A.) ही पदवी उत्कृष्ट श्रेणीत प्राप्त केली असून परिसरात त्यांच्या या यशाचा मोठ्या उत्साहात गौरव केला जात आहे. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि ध्येयाप्रती दृढ निश्चय यांच्या बळावर आदित्य यांनी ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली. C.A. सारखी स्पर्धात्मक आणि आव्हानात्मक परीक्षा उत्तीर्ण केल्याने त्यांच्या कुटुंबियांसह मित्रमंडळ व ग्रामस्थांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



## “बिल्डिंग बेटर किचन” कार्यक्रमात रत्नानी आणि आचार्य यांची उपस्थिती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नॅशनल रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडिया (एनआरएआय) पुणे चॅप्टरने त्यांच्या प्रमुख कार्यक्रम "बिल्डिंग बेटर किचन" चे यशस्वी आयोजन फर्ग्युसन कॉलेज रोडवरील सोशल येथे मंगळवारी, १८ नोव्हेंबर २०२५ रोजी केले. पुणे गॅसच्या सहकार्याने आणि ॲलिस्टर इक्विपमेंटच्या सहयोगाने, या कार्यक्रमात १६० हून अधिक शेफ, रेस्टॉरंट मालक, सेवा पुरवठादार आणि एफ अँड बी क्षेत्रातील प्रमुख सहभागी झाले. कार्यक्रमात व्यावसायिक किचन डिझाईन आणि ऑपरेशन्समध्ये सुधारणा या विषयावर सखोल चर्चा झाली. निवडक टेक ब्रँड्सने तंत्रज्ञानाच्या मदतीने ऑपरेशन, व्यवस्थापन आणि रेस्टॉरंट्सच्या कामगिरीत सुधारणा करणारे उपाय सादर केले.



या कार्यक्रमात सेलेब्रिटी शेफ विकी रत्नानी यांनी त्यांच्या व्यावहारिक अनुभव, कुकिंगमधील सर्जनशीलता आणि पुढारलेल्या दृष्टिकोनाद्वारे उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्यासोबत उत्कृष्ट किचन सल्लागार श्री. सदानंद आचार्य यांनी किचन नियोजन व कार्यक्षमता वाढवण्याबाबत उपयुक्त माहिती दिली. दोन्ही वक्त्यांनी भारताच्या झपाट्याने वाढणाऱ्या फूड सर्विस इंडस्ट्रीच्या बदलत्या गरजा, आधुनिक किचन डिझाईन, वर्कफ्लो ऑप्टिमायझेशन, ऊर्जा कार्यक्षमता, सुरक्षेतील नाविन्य आणि शाश्वततेचे तत्त्व यावर प्रकाश टाकला.

सहभागी उपस्थितांना भविष्यातील तंत्रज्ञान आणि ट्रेंडप्रमाणे किचन कसे गतिमान, अनुपालनक्षम व टिकाऊ बनवता येतील याबाबत महत्त्व ठेवणाऱ्या गोष्टी मिळाल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जनतेसाठी शब्द, विकासासाठी कृती - आमदार शेखर निकम

चिपळूण (आरंभ पर्व) : देव दिवाळीच्या शुभमुहूर्तावर असुर्डे गावातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या सुकाई देवी मंदिर रस्ता विकासकामाचे भूमिपूजन आमदार शेखर निकम यांच्या शुभहस्ते अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावात संपन्न झाले. गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामस्थांना गैरसोय निर्माण करणारा २ किमी लांबीचा दुर्गम रस्ता आता सुरक्षित, सोयीस्कर आणि दर्जेदार रूपात विकसित होणार असल्याची माहिती आमदार साहेबांनी यावेळी दिली. या कामासाठी त्यांनी विविध विकास निधीतून ६० लाख रुपयांचा महत्त्वपूर्ण निधी उपलब्ध करून दिल्याचेही सांगितले. रस्त्याचे काम दर्जेदार आणि वेगाने पूर्ण करण्याबाबत त्यांनी ठाम आश्वासन दिले. कार्यक्रमाची सुरुवात गावच्या आराध्य दैवत सुकाई माता यांना नारळ वाढवून करण्यात आली. हा मान मां. कमलाकर गावकर यांना मिळाला. त्यानंतर विधिवत भूमिपूजन सोहळा पार पडला. या प्रसंगी अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. त्यात माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रोहनजी बने, जिल्हा परिषद गटाध्यक्ष संजयजी कदम, उपाध्यक्ष सुधीर राजे, पंचायत समिती गणाध्यक्ष नागेशजी साळवी, उपाध्यक्ष निलेश खापरे, सरपंच पंकज साळवी, उपसरपंच दिलीप जाधव, तसेच निर्मळवाडीतील अनंत निर्मळ, यशवंत निर्मळ, राजाराम निर्मळ, महादेव चोगले, प्रभाकर चोगले, गंगाराम चोगले, तानाजी चोगले, शिवाजी चोगले, समीर चोगले, अजित खापरे, शैलेश खापरे, मुंबई मंडळ अध्यक्ष संतोष चोगले, सचिव सूर्यकांत निर्मळ यांचा समावेश होता.

### सिंहगड परिसरातील वाहतूक वळविण्याबाबत आदेश जारी

पुणे (आरंभ पर्व) : पुणे ग्रँड चॅलेंज दूर सायकलिंग स्पर्धा 2026 आयोजित करण्यात येत असून या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर सुरक्षितता व वाहतूक व्यवस्थापन लक्षात घेता मोटार वाहन कायदा 1988 चे कलम 115 तसेच शासन गृह विभागाच्या 19 मे 1990 च्या अधिसूचनेनुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी 19 नोव्हेंबर 2025 रोजी रात्री 00.01 वा. ते 20 नोव्हेंबर 2025 रोजी रात्री 24.00 वा. तसेच 24 नोव्हेंबर 2025 रोजी रात्री 24 वा. ते 26 नोव्हेंबर 2025 रोजी रात्री 24 वा. या कालावधीत सिंहगड परिसरातील खालीलप्रमाणे वाहतूक वळविण्याचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार सिंहगड किल्ल्यावर पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांसाठी कोणताही पर्यायी मार्ग उपलब्ध नसल्याने या कालावधीत सिंहगड किल्ला मार्ग पूर्णपणे बंद राहणार आहे. मौजे पानशेत, खानापूर, डोणजे, अतकरवाडी या बाजूने सिंहगड घाटमार्गाने खेड-शिवापूरकडे जाणारी सर्व वाहतूक बंद करण्यात येत आहे. उक्त परिसरातील नागरिकांनी डोणजे चौक – खडकवासला – किरकटवाडी – नांदेड सिटी – वडगाव धायरी मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्र. 48 (पुणे–बेंगळुरू महामार्ग) वापरून खेड-शिवापूरकडे प्रवास करावा. नागरिकांनी स्पर्धेच्या सुरळीत आयोजनासाठी वाहतूक यंत्रणेस सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी डुडी यांनी केले आहे.

## नाशिक कुंभमेळ्यासाठी वृक्षतोडीचा प्रस्ताव, पुण्यात तीव्र विरोध

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
**विशाल भालेराव**

पुढील वर्षी नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तपोवन परिसरातील अनेक वृक्षतोडीचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून या निर्णयाचा तीव्र विरोध होत आहे. साधू-संतांच्या नियोजनासाठी झाडे तोडण्याची कार्यवाही होणार असल्याची माहिती पुढे आल्यानंतर एरंडवणे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने आज गरवारे कॉलेज मेट्रो स्टेशन चौकात जोरदार निदर्शने केली.

“आम्हाला पाहिजे आहे स्वच्छ मोकळी हवा व गारवा” अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.




मंडळाने स्पष्ट भूमिका मांडली की हवा, सावली व पर्यावरण राखण्याची क्षमता फक्त वृक्षांमध्ये असून काहीही कारणास्तव वृक्षतोड मान्य होणार नाही.

मंडळाचे अध्यक्ष प्रशांत वेलणकर म्हणाले, “सोशल मीडियावर तपोवन परिसरातील झाडांचे व्हिडिओ पाहिल्यावर कळते की या झाडांच्या फांद्यांचा व्यास ४ ते ५ फूट आहे. ही सर्व झाडे शेकडो वर्षांची असून नाशिकमध्ये यापूर्वी अनेक कुंभमेळे झाले, पण कधीच वृक्षतोड झाली नाही. मग यावेळीच झाडे तोडण्याची गरज का निर्माण झाली?”

त्यांनी सांगितले की पुण्यातील प्रमुख गणेश मंडळांना भेटून या निर्णयाचा विरोध वाढविण्यासाठी जागृती मोहीम राबविण्यात येणार असून मोठे जन आंदोलन उभारण्याचा मानस आहे.

निदर्शनांना युवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षतोडीचा निषेध नोंदवत त्यांनी पर्यावरण संवर्धनाचा आवाज बुलंद केला.




## नगरसेवकांची कामे : जबाबदाऱ्या, अधिकार आणि जनसेवेची व्याप्ती

**(दै. आरंभ पर्व)**

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सर्वात जवळचा लोकप्रतिनिधी म्हणजे नगरसेवक. शहरातील प्रभागाचे प्रतिनिधित्व करताना नागरिकांच्या दैनंदिन समस्या, विकासकामे आणि नागरी सुविधांची जबाबदारी नगरसेवक पार पाडतो. निवडून आल्यावर नगरसेवकांची कामे केवळ रस्ते बनवणे किंवा पाणी पुरवठा एवढ्यापुरती मर्यादित नसून त्याची व्याप्ती खूप मोठी आहे. खाली नगरसेवकाची प्रमुख कामे व जबाबदाऱ्या सविस्तर दिल्या आहेत.

**१. प्रभागातील मूलभूत सुविधांची देखभाल**

- रस्ते, गटारे, पाणीपुरवठा, स्ट्रीटलाइट्स, स्वच्छता व्यवस्था यांची नियमित देखभाल.
- जीर्ण झालेल्या पायाभूत सुविधांचे दुरुस्ती, पुनर्बांधणी किंवा उन्नतीकरण यासाठी प्रस्ताव सादर करणे.
- कचरा संकलन, स्वच्छता मोहीम, सार्वजनिक स्वच्छतागृहांची स्थिती यावर लक्ष ठेवणे.

**२. विकासकामांसाठी निधी मिळवणे आणि मंजुरी प्रक्रिया**


- प्रभागातील विकासकामांसाठी आवश्यक प्रस्ताव महानगरपालिकेस सादर करणे.
- निधी मंजुरी, अंदाजपत्रक, टेंडर प्रक्रिया, कामांचे गुणवत्तापूर्ण नियोजन पाहणे.
- राज्य/केंद्र सरकारच्या योजना प्रभागात प्रभावीपणे राबवण्यासाठी पाठपुरावा करणे.

**३. सार्वजनिक समस्या सोडवणे**

- नागरिकांना भेडसावणाऱ्या तत्काळ समस्या (पाणी गळती, खराब दिवे, कचऱ्याचे प्रश्न, अतिक्रमण) दूर करण्यासाठी संबंधित विभागांशी समन्वय साधणे.
- तक्रार निवारण शिबिरे, जनसंपर्क कार्यालय, व्हॉट्सअॅप/हेल्पलाइनद्वारे तक्रारी स्वीकारणे.

**४. प्रभागातील सामाजिक उपक्रम**

- आरोग्य शिबिरे, वृक्षारोपण, महिला बचत गट, युवांसाठी कौशल्यविकास उपक्रम, ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यक्रम राबवणे.
- शाळा, अंगणवाडी, क्रीडा संकुले, वाचनालये यांना गरजेनुसार मदत आणि सुविधा उपलब्ध करून देणे.



**५. सभागृहातील सहभाग**

- महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत, समित्यांमध्ये आणि बैठकींमध्ये सक्रिय सहभाग घेणे.
- स्थानिक प्रश्न, नागरिकांच्या अडचणी, विकास योजनेवरील सूचना आणि आक्षेप सभागृहापुढे मांडणे.
- धोरणात्मक निर्णय, कर आकारणी, नियोजन आणि बजेट मंजुरी प्रक्रियेत भूमिका बजावणे.

**६. कायदेशीर आणि प्रशासकीय जबाबदाऱ्या**

- महानगरपालिकेच्या कायद्यांनुसार प्रशासनाची कामे नीट पार पडत आहेत का, यावर लक्ष ठेवणे.
- अनाधिकृत बांधकामे, अतिक्रमण, पर्यावरणीय नियमभंग यावर योग्य कारवाई करण्यासाठी पाठपुरावा.

**७. नागरिक व प्रशासन यांच्यातील दुवा**

- प्रभागातील लोकांच्या मागण्या, अडचणी आणि सूचना प्रशासनापर्यंत पोहोचवणे.
- सरकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवणे आणि त्यांचा लाभ मिळवून देणे.
- नागरिक व प्रशासन यांच्यात संवादाचे सेतू म्हणून भूमिका.

**८. आपत्कालीन परिस्थितीतील कार्य**

- पावसाळ्यातील आपत्ती, पूरस्थिती, आग, रस्ता कोसळणे, आरोग्य आपत्कालात तातडीची मदत व समन्वय.
- आपत्ती व्यवस्थापन पथक, अग्निशमन विभाग, आरोग्य विभाग यांना आवश्यक माहिती व मदत देणे.

**९. विकास आराखडे आणि दीर्घकालीन प्रकल्प**


- प्रभागातील वाहतूक आराखडा, उद्यानं, शाळा, क्रीडांगण, रुग्णालये, पाणी योजनांसाठी दीर्घकालीन नियोजन करणे.
- शहराच्या विकास आराखड्यात (DP) प्रभागाच्या गरजेनुसार बदल/सुधारणा सुचवणे.

**१०. जनतेपुढे उत्तरदायी असणे**

- नियमित जनसंपर्क, खुल्या सभांचा आयोजन, कार्याचा अहवाल जाहीर करणे.
- नागरिकांच्या प्रश्नांना पारदर्शक आणि प्रामाणिक उत्तरदायित्वाने प्रतिसाद देणे.

नगरसेवक हा फक्त राजकीय पद नसून समाजातील अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. प्रभागातील प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन आयुष्याशी जोडलेल्या सुविधा, सेवा आणि विकास हा नगरसेवकाच्या सक्रिय कार्यक्षमतेवर अवलंबून असतो. म्हणूनच नगरसेवकांची कामे व्यापक, लोकाभिमुख आणि सातत्याने जनसेवेसाठी तयार असणारी असतात.

## थोडक्यात पण महत्वाचे




## गणेश पेठ-नाना पेठेत पोलिसांची कडक मोहीम

- गँगवॉरला आळा घालण्यासाठी बंडू आंदेकरच्या तीन मुलांची धिंड

पुणे (आरंभ पर्व) : शहरात वाढत्या गँगवॉरच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी मोठी कारवाई करत आंदेकर टोळीला थेट त्यांच्या वर्चस्वाच्या पेठांमध्ये उघडावर आणले आहे. माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या हत्येनंतर बदला घेण्यासाठी आक्रमक झालेल्या या टोळीवर गेल्या तीन महिन्यांत दोन हत्यांचे आरोप आहेत. आयुष कोमकर आणि गणेश काळे यांच्या खुनांनंतर शहरात निर्माण झालेली दहशत लक्षात घेऊन पोलिसांनी निर्णायक पावले उचलली. विशेष म्हणजे, आयुष कोमकर हा टोळीप्रमुख बंडू आंदेकर याचा नातू असूनही अंतर्गत मतभेदातून त्याची निर्दयी हत्या करण्यात आल्याने आंदेकर गटातील फुट अधिक तीव्र झाली. वनराज आंदेकर खून प्रकरणातील संशयित समीर काळेच्या भावाची काही दिवसांपूर्वी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या सर्व घटनांमुळे आंदेकर टोळीने पुणे शहर आणि ग्रामीण भागात दहशत निर्माण केल्याचे चित्र होते. या वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी निर्णायक कारवाई केली. टोळीचा मुख्य आधार मानल्या जाणाऱ्या बंडू आंदेकरच्या कृष्णा आंदेकर, अभिषेक आंदेकर आणि शिवराज आंदेकर या तिन्ही मुलांची गणेश पेठ आणि नाना पेठेत धिंड काढण्यात आली. घरझडतीदरम्यान पोलिसांनी आरोपींना टोळीची सर्वाधिक दहशत असलेल्या भागात नेले आणि तिथेच सार्वजनिकपणे मोहीम राबवून स्थानिकांमध्ये निर्माण झालेला गटाचा दरारा कमी करण्याचा प्रयत्न केला.

## जेपी नगर परिसरातील धोकादायक ओव्हरहेड विजेच्या तारा भूमिगत

नांदेड (पुणे) (आरंभ पर्व) : जेपी नगर परिसरातील धोकादायक स्थितीत असलेल्या ओव्हरहेड HT व LT लाईन अखेर हटविण्याचा मार्ग मोकळा झाला असून, येत्या काही दिवसांत या सर्व तारा भूमिगत करण्याची कामे सुरू होणार आहेत. या कामासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. किरकवाडी फाट्याकडे वळताना सिंहगड रोडवरील ओव्हरहेड HT लाईनमुळे ट्रॅफिकला मोठा अडथळा निर्माण होत होता. संबंधित विभागाच्या माहितीनुसार या तारा जानेवारी अखेरपर्यंत पूर्णपणे काढून टाकण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे जेपी नगरमधील धोकादायक ओव्हरहेड LT लाईन हटविण्यासाठीही आवश्यक निधीची तरतूद करण्यात येत असून कामांसाठी हिरवा कंदील मिळाला आहे. परिसरातील अनेक ठिकाणी वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या HT लाईन काढण्याची कामे सुरू आहेत. काही ठिकाणी कामे सुरू झाली असून उर्वरित कामे पुढील टप्प्यात पूर्ण केली जाणार आहेत.







# नवले पुलाजवळील भीषण अपघाताचे कारण स्पष्ट

- आरटीओच्या तपासात अतिवेग आणि मानवी चूक ठपका
- सातारा-पुणे मार्गावर तपासणीसाठी आणखी एक पथक नियुक्त



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवले पुलाजवळ १३ नोव्हेंबरला झालेल्या भीषण अपघातामागील कारण अखेर स्पष्ट झाले आहे. प्रादेशिक परिवहन विभागाच्या (आरटीओ) प्राथमिक तपासात कंटेनरचा अतिवेग आणि चालकाने वाहन न्यूट्रलवर टाकल्याची शक्यता हे अपघाताचे प्रमुख घटक असल्याचे समोर आले आहे. अतिवेगामुळे वाहनावरील नियंत्रण सुटून हा अपघात घडल्याची माहिती आरटीओने दिली. यामुळे हा अपघात मानवी चुकांमुळे झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

अपघातात कंटेनर आणि कार दोन्हीही जळाल्याने गिअर बॉक्सची तपासणी करणे अशक्य झाले होते. त्यामुळे अपघाताची कारणमीमांसा करण्यासाठी आरटीओला तांत्रिक माहिती, साक्षीदारांचे बयान तसेच सीसीटीव्ही फुटेज यांचा आधार घ्यावा लागला. अंतिम तपास अहवाल तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे.

नवले पुलाजवळील या दुर्घटनेत कंटेनरने अनेक वाहनांना उडवून दिल्यानंतर एका कारला मागून धडक दिली. कार कंटेनरमध्ये अडकली आणि दोन्ही वाहनांना भीषण आग लागून आठ जणांचा मृत्यू झाला होता.

अशा अपघातांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आरटीओने सातारा-पुणे मार्गावरील तपासणी यंत्रणा अधिक मजबूत केली आहे.

सातारा-पुणे मार्गावरील वाढीव तपासणीचे प्रत्यक्ष निरीक्षण शुक्रवारी केले जाणार असल्याची माहितीही गायकवाड यांनी दिली.

नवले पूल परिसर अपघातप्रवण ठरत असल्याने, आरटीओ आणि वाहतूक पोलिसांच्या संयुक्त कारवाईमुळे या मार्गावरील सुरक्षिततेत निश्चितच सुधारणा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार-पूर्वी एकच तपासणी पथक होते;
> - आता दोन पथकांमध्ये १० अधिकारी नियुक्त
> - एक पथक संपूर्ण मार्गावर फिरते राहणार
> - दुसरे पथक टोल नाका परिसरात थांबून
> - जड वाहनांची कागदपत्रे तपासणार
> - ओव्हरलोडिंगची पडताळणी करणार
> - चालकांची ब्रेथ ॲनालायझरद्वारे तपासणी
> - जड वाहनचालकांना सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन
> - कात्रज बोगद्याच्या पुढील उतारावर "न्यूट्रलवर वाहन न टाकण्याच्या" विशेष सूचना

### स्थानिकांसाठी नियम
# परप्रांतीयांसाठी सूट?



- खडकवासला धरण परिसरातील स्थानिकांचा संताप
- परप्रांतीयांची दुकाने फोफावली, स्थानिकांना मात्र बंदी!
- प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**
**विशाल भालेराव**

खडकवासला धरण परिसरात स्थानिक नागरिकांची दुकाने बंद करून परप्रांतीयांना व्यवसायासाठी मोकळे रान मिळत असल्याचा गंभीर आरोप संतोष वरपे यांनी केला आहे . धरण परिसरात पर्यटन हंगाम वाढला तशी परप्रांतीयांची स्टॉल, फुड-कार्ट आणि अस्थायी दुकाने मोठ्या प्रमाणात उभी राहत आहेत. यावर प्रशासन मात्र कारवाई करत नसल्याने स्थानिकांत तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

स्थानिक नागरिक म्हणतात की, "परप्रांतीयांनी व्यवसाय करावा याला आम्ही विरोध नाही. पण स्थानिकांना दुकाने लावू देत नाही आणि परप्रांतीयांकडे मात्र प्रशासन डोळेझाक करते, हे अन्यायकारक आहे. पुण्यात अनेक ठिकाणी परप्रांतीयांची रस्त्यावर दुकाने फोफावली आहेत, त्यावर कारवाई होत नाही कारण त्यांच्याकडून प्रशासनाला 'हप्ते' मिळतात, अशी चर्चा आहे." परिसरात अनधिकृतपणे उभ्या राहणाऱ्या दुकानांमुळे वाहतूक कोंडी, कचरा निर्मिती, अतिक्रमण आणि सुरक्षेचे प्रश्न निर्माण होत आहेत. तरीही स्थानिकांच्या तक्रारींवर संबंधित यंत्रणा शांत असल्याने संताप अधिक वाढत आहे.

परिसरातील ग्रामस्थांनी प्रशासनाला स्पष्ट मागणी केली आहे की— स्थानिकांच्या उपजीविकेला प्राधान्य द्यावे परप्रांतीयांच्या अनधिकृत दुकानांवर कारवाई करावी धरण परिसरातील व्यवसाय संपूर्णपणे नियमबद्ध करावा संतोष वरपे यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, परिस्थिती अशीच कायम राहिल्यास मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडले जाईल.

# गोऱ्हे खुर्दच्या भरवस्तीत पहाटे बिबट्याचा प्रवेश

- दोन महिन्यांच्या पारड्यावर हल्ला; परिसरात भीतीचे वातावरण
- वन विभागाने तात्काळ प्रभावी उपाययोजना कराव्यात - पुजाताई नवनाथ पारगे



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**
**विशाल भालेराव**

सिंहगड पायथ्याला वसलेल्या गोऱ्हे खुर्द गावात धडकी भरवणारी घटना घडली. साधारण पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास एक बिबट्या थेट भरवस्तीमध्ये शिरला आणि दत्तात्रय खिरीड यांच्या गोठ्यात घुसून दोन महिन्यांच्या पारड्यावर हल्ला करून ठार केले. या घटनेनंतर संपूर्ण गावात भीतीचे सावट पसरले आहे.

भरवस्तीत बिबट्याची वर्दळ, नागरिकांमध्ये संभ्रमाची स्थिती आहे. गावातील घरे वस्तीला एकमेकांना लागून असतानाच बिबट्याने एवढ्या आत प्रवेश केल्याने रहिवाशांमध्ये प्रचंड घबराट निर्माण झाली आहे.

स्थानिकांच्या मते, बिबट्याची हालचाल गेल्या काही दिवसांपासून जाणवत होती. सकाळी हल्ल्यानंतर परिसरात सतत हालचाल असल्याचे चिन्ह दिसले. लहान जनावरे, पाळीव कुत्री धोक्यात आहेत. खाद्याच्या शोधात बिबट्यांचे जंगलाबाहेर चाळे

गोऱ्हे खुर्द लगतच सिंहगडचे घनदाट जंगल असल्याने बिबट्यांची संख्या या भागात नेहमीच जाणवते.

वन विभागाच्या प्राथमिक माहितीनुसार "सायंकाळपासून पहाटेपर्यंत बिबटे खाद्याच्या शोधात सतत हालचाल करतात. कुत्री, शेळ्या, वासरे यांच्यावर हल्ले वाढले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी घराबाहेरील जनावरे रात्री सुरक्षित बांधून ठेवावीत," असे आवाहन वन अधिकाऱ्यांनी केले.

> "गोऱ्हे खुर्दमध्ये बिबट्याने भरवस्तीत प्रवेश केल्याची गंभीर घटना आहे. आम्ही पथक तैनात केले असून परिसरातील हालचाल तपासली जात आहे. नागरिकांनी घाबरू नये, परंतु सावधगिरी बाळगावी."
> - समाधान पाटील, वनपरिमंडळ अधिकारी, सिंहगड वन विभाग

> दत्ता खिरिड म्हणाले "भरवस्तीत बिबट्या शिरला म्हणजे आता धोक्याची पातळी गंभीर झाली आहे. वन विभागाने तात्काळ प्रभावी उपाययोजना कराव्यात, गरज असल्यास पिंजरा लावावा," अशी मागणी केली आहे . तसेच माजी सभापती पुजाताई नवनाथ पारगे म्हणाल्या वन विभागाने तात्काळ प्रभावी उपाययोजना कराव्यात आणि नागरीकांना दिलासा द्यावा.

## नवले ब्रिज परिसरात अपघातग्रस्त ठिकाणी विधिवत दशक्रिया विधी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



नवले ब्रिज परिसरातील वाढत्या अपघातांमुळे उद्भवलेल्या असंतोषाचा आवाज आज पुन्हा बुलंद झाला. नऱ्हे ग्रामस्थांनी प्रतीकात्मक विधिवत दशक्रिया विधी करून या भागात सतत होणाऱ्या जीवितहानीचा निषेध व्यक्त केला. परिसरात शांतता राखण्यासाठी पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता. या आंदोलनाची पार्श्वभूमी अधिक तीव्र आहे. मागील दहा दिवसांपूर्वीच सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी 'तिरडी आंदोलन' करून प्रतिकारक अंत्यविधी केला होता, ज्यामुळे संपूर्ण पुण्यात प्रशासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वळले होते. मृत्यूंच्या मालिकेचा तीव्र निषेध आणि प्रशासनाला जाग करण्यासाठी मोरे यांनी केलेले ते आंदोलन मोठ्या प्रमाणावर चर्चेत राहिले. आजच्या दशक्रिया विधीदरम्यानही मोरे यांनी ठाम भूमिका मांडली— "वरवरच्या उपायांवर खर्च न करता हा महामार्ग पुन्हा नव्याने बांधणी करा किंवा भूमिगत महामार्गाचा पर्याय लागू करा. अन्यथा येत्या काही दिवसांत आम्ही रस्ता रोको करणार," असा थेट इशारा त्यांनी दिला. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांमध्ये निलेश दमिष्टे, माजी जि.प. सदस्य सुरेखा दमिष्टे, काँग्रेस नेत्या अर्चना शहा, राजेभाऊ जाधव, सोमनाथ शेडगे, संजय सुर्वे, गणेश निंबाळकर, विठ्ठल सूर्यवंशी, हरीश वैद्य, लतिफ शेख, प्रशिक दारुंडे, सुनील पढेर, सुरज दांगडे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक, पत्रकार आणि पोलीस बांधवांचा समावेश होता.

# नऱ्हे-वडगाव-धायरी प्रभागात उमेदवारीची चुरस वाढली

## तिकीट वाटपानंतर नाराजी नाट्याची शक्यता; भाजपा आणि राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांमध्ये अटीतटीची लढत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



आगामी पुणे महापालिका निवडणुकीत नऱ्हे-वडगाव-धायरी प्रभाग हा सर्वाधिक चर्चेत असलेला प्रभाग ठरत आहे. भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या तिन्ही पक्षांची येथे मजबूत घडी असल्याने थेट त्रिकोणी लढत होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. सर्वच पक्षांमध्ये इच्छुकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढल्याने उमेदवारीसाठी प्रचंड स्पर्धा निर्माण झाली असून, तिकीट वाटपानंतर मोठ्या प्रमाणात नाराजी उसळण्याची शक्यता राजकीय वर्तुळात जोरदारपणे बोलली जात आहे.

**प्रभागाचा विस्तार बदलला, समीकरणे बदलली :** जुन्या वडगाव-धायरी प्रभागासोबत नऱ्हे गाव आणि धायरीचा नव्याने समाविष्ट झालेला भाग जोडून हा प्रभाग तयार झाला आहे. मात्र वडगाव बुद्रुकचे विभाजन झाल्यामुळे येथील नागरिकांमध्ये नाराजी कायम आहे. प्रभागाची एकूण लोकसंख्या 83,867 असून त्यातील जवळपास 40 हजार मतदार धायरी भागातील आहेत. त्यामुळे तिकीट वाटपात धायरीच्या उमेदवारांना वरचष्मा मिळण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

राजकीय आघाड्यांचे चित्र अजूनही स्पष्ट नसल्याने गोंधळ वाढत आहे. महायुती-महाआघाडीमध्ये मतैक्य होणार का? शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसे एकत्र येणार का? याबाबत अद्याप अनिश्चितता कायम आहे. दरम्यान, सर्वच पक्षांचे इच्छुक सामाजिक कार्यक्रमांद्वारे मतदारांशी संपर्क वाढवू लागले आहेत. प्रभागात 'अ' गट मागासवर्गीय, 'ब' आणि 'क' गट महिला सर्वसाधारण, तर 'ड' गट सर्वसाधारण असे आरक्षण लागू आहे.

गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत भाजपने या प्रभागावर मजबूत पकड ठेवली होती. राजाभाऊ लायगुडे, हरिदास चरवड, नीता दांगट आणि राजश्री नवले हे नगरसेवक म्हणून निवडून आले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवारही अनेक ठिकाणी दमदार लढत देत होते.

यावेळी मात्र राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट निवडणुकीत आणखी चुरस निर्माण करू शकते. दोन्ही गटांची स्वतंत्र उमेदवारी असल्यास मतविभाजन होण्याची शक्यता प्रबळ आहे.

तसंच पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक, माजी नगरसेवक विकास दांगट कोणत्या पक्षाच्या बाजूने झुकतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

भाजप किंवा राष्ट्रवादीतील इच्छुकांना तिकीट न मिळाल्यास ते थेट प्रतिस्पर्धी पक्षात प्रवेश करून निवडणूक लढवण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा पक्षांतरांमुळे प्रभागातील राजकीय चित्र पूर्णपणे बदलू शकते. स्थानिक मतदारांचे झुकते माप कधी राष्ट्रवादीकडे, तर कधी भाजपकडे राहिले आहे. त्यामुळे प्रत्येक मत महत्वाचे ठरणार आहे.

एकंदरीत, नऱ्हे-वडगाव-धायरी प्रभागात राजकीय तापमान चांगलेच वाढले असून, निवडणूक लढत अतिशय रंगतदार होणार आहे. तिकीट वाटपापासून मतदानाच्या दिवसापर्यंत प्रत्येक घडामोड या प्रभागातील समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण करीत आहे.

भारतीय जनता पार्टी कडून काही नवख्या उमेदवारांना संधी मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.. त्यामुळे काही माजी नगरसेवकांचा पत्ता कट होऊ शकतो अशी शक्यता व्यक्त होत आहे. यामुळे या प्रभागात मोठी चुरस निर्माण होणार आहे.

### इच्छुकांची लांबलचक यादी - तिकीट मिळणे कठीण

**भाजपकडून प्रमुख इच्छुक :** राजाभाऊ लायगुडे, हरिदास चरवड, नीता दांगट, राजश्री नवले, अतुल चाकणकर, जयश्री पोकळे, बाळासाहेब नवले, जयश्री भूमकर, गंगाधर भडावळे, सारंग नवले, बापू पोकळे, माधुरी चाकणकर, सागर भूमकर, यशवंत लायगुडे, स्वप्निल कुटे,कोमल सुशांत कुटे, कोमल सतीश कुटे, मंजिरी जाधव.

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) :** पोपटराव खेडेकर, प्रभावती भूमकर, सुरेखा दमिष्टे, राजेश्वरी पाटील, सुप्रिया भूमकर, स्वाती पोकळे, संतोष चाकणकर, शरद दबडे, नीलेश दमिष्टे.

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) :** भूपेंद्र मोरे, अक्रूर कुदळे. भाग्यश्री विकास कामठे

**शिवसेना (ठाकरे गट) :** भरत कुंभारकर, महेश पोकळे, अमोल दांगट, सुनीता खंडाळकर.

**शिवसेना (शिंदे गट) :** नीलेश गिरमे, सोमनाथ कुटे.

**इतर पक्ष :** आम आदमी पक्षाकडून धनंजय बेनकर तयारीत आहेत. मनसेकडून शिवाजीराव मते अनपेक्षितपणे प्रभाग ३४ मध्ये निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. पत्रकार विठ्ठल तांबे हेही अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. रिपाइ, बसप, वंचित बहुजन आघाडीमध्येही उमेदवार निवडीची लगबग सुरू.

### नातेवाईकांची चुरस - मतविभाजन अनिवार्य?

या प्रभागातील अनेक इच्छुक एकमेकांचे नातेवाईक असल्याने मतांचे तुकडे होण्याची शक्यता तीव्र आहे. शिवाय राष्ट्रवादीचे दोन गट असल्याने त्यांच्यातील मतांचे विभाजन इतर उमेदवारांना संधी देऊ शकते. तिकीट न मिळालेल्या नाराज इच्छुकांचे छोटे पॅनेल तयार होण्याचीही शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### वेळू गावातील कु. पार्थ रविंद्र खुंटे यांची भारतीय सैन्यात निवड

भोर-विशाल भालेराव (आरंभ पर्व) : भोर तालुक्यातील वेळू गावातील शेतकरी कुटुंबातील मुलगा कु. पार्थ रविंद्र खुंटे याने कठोर परिश्रम, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर इंडियन आर्मी जी.डी. पदासाठी पात्रता मिळवत वेगळी ओळख निर्माण केली आहे. सैन्यात निवड होणे हे प्रत्येक युवकाचे स्वप्न; ते स्वप्न पार्थने पूर्ण केल्याने गावात आणि परिसरात आनंदाचे वातावरण आहे. शेतकरी कुटुंबातील आव्हानात्मक परिस्थितीत शिक्षण घेत असतानाच पार्थने लहानपणापासून सैन्यात जाण्याचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवले. शारीरिक तयारी, धावण्याचे प्रशिक्षण, अभ्यास आणि कठोर शिस्त या सर्वांवर त्यांनी विशेष मेहनत घेतली. अखेर Indian Army च्या भरती प्रक्रियेत त्यांनी उत्तम कामगिरी करत आर्मी GD पदासाठी पात्रता मिळवली. स्थानिक ग्रामस्थ, मित्रपरिवार आणि नातेवाईकांनी पार्थचे अभिनंदन करत सांगितले की, “शेतकरी कुटुंबातील मुलाने सैन्यात निवड मिळवणे हे गावासाठी मोठे अभिमानाचे पाऊल आहे. पार्थसारख्या युवकांनी प्रेरणा घेऊन देशसेवेसाठी पुढे यावे.” पार्थच्या या कामगिरीमुळे वेळू गावासह भोर तालुक्याचा मान अधिक उंचावला आहे. त्यांच्या पुढील सेवाजिवनासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



### ‘आफ्टर ओएलसी’चा दमदार ट्रेलर प्रदर्शित; प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला

पुणे (आरंभ पर्व) : दुनियेच्या आड दडलेलं एक गूढ लवकरच उलगडणार. हो. ‘आफ्टर ओएलसी’ चित्रपटाचा ट्रेलर पाहून असंच वाटू लागलंय. बरेच दिवसांपासून चर्चेत असलेल्या ‘आफ्टर ओएलसी’ चित्रपटाचा ट्रेलर समोर आला आहे. अगदी थाटामाटात ‘आफ्टर ओएलसी’ चित्रपटाचा ट्रेलर लॉंच सोहळा चित्रपटातील कलाकार आणि इतर टीमच्या उपस्थितीत पार पडला. चित्रपटाचा ट्रेलर सुरू होताच वातावरणात एक अज्ञात तणाव पसरतो. मैत्री, विश्वासघात, आणि लपलेल्या रहस्यांच्या या गुंत्यातून बाहेर पडताना हा चित्रपट कोणतं रहस्य मागे सोडणार याची उत्कंठा वाढवणारा आणि रहस्यमय थराराने, एक्शन पॅक्ड सीन्सने भरलेला हा सिनेमा आहे असं ट्रेलरवरून स्पष्ट होतंय. कलाकारांचा दमदार अभिनय, दिग्दर्शकाचे उत्तम दिग्दर्शन, शूट करण्यात डीओपीने कसलीही न सोडलेली कमतरता, जबरदस्त आणि रोमँटिक टच असलेल्या संगीताची जादू या सगळ्या गोष्टींनी ट्रेलरमधूनच चित्रपटाची उत्सुकता वाढवली आहे. हा चित्रपट कन्नड आणि मराठी या दोन्ही सिनेसृष्टीला जोडणारा धागा आहे. कारण यांत निर्माते ते अगदी कलाकार हे कन्नड आणि मराठी या दोन्ही सिनेसृष्टीतील दिग्गज आहेत. आणि प्रेक्षकांसाठी हा संगम पर्वणीच म्हणायला हवी.

### जि. प. सदस्य सौ. अनितातार्इ इंगळे यांनी पोलिसांच्या सेवेला दिला मान

उत्तमनगर, पुणे (आरंभ पर्व) : कडाक्याच्या थंडीमध्ये जनतेच्या सुरक्षेसाठी दिवस-रात्र रस्त्यावर तैनात असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवेला मान देत जिल्हा परिषद सदस्य मा. सौ. अनितातार्इ तुकाराम इंगळे यांनी अत्यंत प्रशंसनीय असा सामाजिक उपक्रम राबवला. उत्तमनगर पोलीस ठाण्यातील महिला पोलीस कर्मचारी तसेच अधिकारी यांना त्यांनी स्वतः भेट देत उबदार ब्लँकेट वाटप केले. पोलिसांप्रती आदरभाव आणि त्यांच्या मेहनतीची दखल म्हणून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. थंडीचा प्रचंड त्रास असतानाही आपल्या प्रभागाचे रक्षण करण्यासाठी अथकपणे काम करणाऱ्या पोलीस दलाचे मनोबल वाढवणे हा अनितातार्इंचा उद्देश. उत्तमनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक खंदारे साहेब हे स्वतः पुढाकार घेऊन विभागातील सुरक्षेवर सातत्याने लक्ष ठेवत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालील सर्व अधिकाऱ्यांचा गौरव करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. या उपक्रमावेळी सरोदे तार्इ – पोलीस पाटील, कोंढवे धावडे, मनोज भाऊ इंगळे,नवनाथ बापु धावडे,नितीन इंगळे,शिवभक्त गणेश राऊत,अविनाश सरोदे,प्रशांत लांडगे,शंतनू दादा किंडरे,सुभाष मामा वाल्मिकी उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनी आणि पोलिस अधिकाऱ्यांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले असून, समाजातील संवेदनशील प्रतिनिधी म्हणून सौ. अनितातार्इ इंगळे यांची प्रतिमा अधिक उंचावली आहे.

### जिल्हाप्रमुख चषक क्रिकेट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसादाची अपेक्षा




खेडशिवापूर-विशाल भालेराव (आरंभ पर्व) : खानापूर (ता. हवेली) येथे जिल्हा परिषद ४२ (खेडशिवापूर-खानापूर गट) मर्यादित गावस्तरीय जिल्हाप्रमुख चषक भव्य क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली असून ही स्पर्धा २६ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर दरम्यान शिवापूर वाडा (ज्ञान प्रबोधिनी ग्राउंड) येथे रंगणार आहे. फक्त ११ रुपये प्रवेश शुल्क ठेवण्यात आले असल्याने परिसरातील युवकांमध्ये स्पर्धेबद्दल मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे. या स्पर्धेत प्रथम येणाऱ्या फक्त ३२ संघांनाच प्रवेश दिला जाणार असून सर्व सामने वन हाफ तसंच नॉकआऊट पद्धतीने खेळवले जाणार आहेत. प्रत्येक सामना सहा षटकांचा असेल आणि स्पर्धेतील सर्व सामने यूट्यूबवरून थेट प्रक्षेपित केले जाणार आहेत. या स्पर्धेचे आयोजन शिवगंगा प्रीमियर लीग कमिटीतर्फे करण्यात आले आहे. खेळाडू व संघांनी लवकरात लवकर नोंदणी करून सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या स्पर्धेमुळे ग्रामीण पातळीवर क्रिकेटला चालना मिळून नवीन खेळाडूंना संधी उपलब्ध होणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# दहा लाखांची बॅग सापडली

## ...आणि प्रामाणिकतेचा झगमगता चेहरा बनली अंजू माने!

**पुणे(दै. आरंभ पर्व)**
**विशाल भालेराव**

सदाशिव पेठ परिसरात रोजच्या कामात गुंतलेल्या ‘स्वच्छ’ संस्थेतील कचरा वेचक अंजू माने यांनी दाखवलेली प्रामाणिकता पाहून संपूर्ण महाराष्ट्र स्तब्ध झाला आहे. रस्त्याच्या कडेला पडलेली दहा लाख रुपये असलेली बॅग त्यांनी कोणताही मोह न बाळगता तिच्या मालकिणीपर्यंत सुखरूप पोहोचवली. पैशासाठी मूल्यांची तडजोड होत असलेल्या काळात ही कृती म्हणजे समाजासाठी एक प्रेरणादायी संदेश ठरली आहे.

२० नोव्हेंबर रोजी सकाळी सातला काम सुरू करणाऱ्या माने यांना आठ-नऊच्या सुमारास रस्त्याच्या कडेला एक बॅग पडलेली दिसली. रोजच्या अनुभवानुसार त्यांनी ती बॅग फीडर पॉइंटवर आणून बाजूला ठेवली. मात्र बॅग उघडताच त्यांच्या समोर एक वेगळंच वास्तव उभं राहिलं—औषधांच्या पिशव्यांसोबत आत होते तब्बल १० लाख रुपये!



पण अंजू माने यांनी क्षणाचाही विलंब न लावता वरिष्ठांना व पोलिसांना माहिती दिली.

पोलिसांनी तातडीने शोध सुरू करून काही तासांतच बॅगच्या मालकिणीपर्यंत पोहोचले. बॅग परत मिळताच संबंधित महिला भावूक झाल्या. त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते आणि त्या अंजू माने यांच्या पाया पडल्या.

माने यांच्या या कर्तृत्वाचे स्थानिक नागरिकांनी कौतुक करत त्यांचा सत्कार केला. सोशल मीडियावर ही कथा क्षणार्धात पसरली. अनेकांनी लिहिले - “खरे नायक सिनेमात नाही... आपल्या समाजात शांतपणे काम करणाऱ्या अंजू तार्इंसारख्या लोकांमध्ये असतात.”

### समाजाला दिला मानवतेचा संदेश

**लोभ, स्वार्थ आणि पैशाच्या मागे धावणाऱ्या जगात अंजू माने यांनी दाखवून दिले की अजूनही चांगुलपणा जिवंत आहे. दहा लाखांची बॅग परत करणं म्हणजे फक्त एक प्रामाणिक कृती नव्हती. ती होती मूल्यांची जपणूक, समाजाला दिलेलं धडे आणि मानवतेचा सर्वात सुंदर चेहरा. अंजू तार्इ, महाराष्ट्र तुम्हाला अभिमानाने सलाम करतो!**

## बहुली ग्रामपंचायतीत रिंग रोड विषयक महत्वाची बैठक

- **ग्रामस्थांना उपस्थितीचे आवाहन**

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

बहुली – बहुली, भगतवाडी, गायकवाडवाडी व पोटेवाडी परिसरातील रिंग रोडसंबंधी सुरू असलेल्या विविध तक्रारी आणि अडचणींवर तोडगा काढण्यासाठी येत्या २४ नोव्हेंबर २०२५ रोजी सोमवारी सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालय, बहुली येथे महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस रिंग रोड विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार असून ग्रामस्थांच्या अडचणी, सूचना व समस्या याबाबत थेट अधिकाऱ्यांसमोर चर्चा होणार आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेले रस्त्याचे प्रश्न, नुकसानभरपाई, कामाचा वेग, प्रलंबित तक्रारी तसेच भविष्यातील उपाययोजना यावर सविस्तर संवाद अपेक्षित आहे. ग्रामपंचायत आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने ही बैठक आयोजित करण्यात आली असून बहुली, भगतवाडी, गायकवाडवाडी व पोटेवाडी येथील सर्व ग्रामस्थांनी सकाळी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या बैठकीत ग्रामस्थांचा व्यापक सहभाग महत्त्वपूर्ण ठरणार असून रिंग रोड विषयक निर्णय प्रक्रियेला गती मिळेल.

## गरजू व हुशार विद्यार्थ्यांना संजय पासलकर यांची मदतीची हातभार

**खानापूर (दै. आरंभ पर्व)**
**विशाल भालेराव**

“शिक्षणासाठी पैशांची अडचण आड येऊ देणार नाही,” अशी भूमिका घेत कै. बाबुरावजी पासलकर प्रतिष्ठान, पुणे यांच्यावतीने ग्रामीण भागातील गरजवंत विद्यार्थ्यांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालय, खानापूर येथील विद्यार्थ्यांना सुमारे २० हजार रुपयांचे शैक्षणिक सहाय्य सचिव संजयजी पासलकर यांनी प्रदान केले.

हा उपक्रम ‘जागर सावित्रीचा’ अंतर्गत तसेच कै. विनायक शंकर तांदळे यांच्या स्मरणार्थ पार पडला. आर्थिक मदत देताना संजय पासलकर म्हणाले, “विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन कुटुंबाचे आणि शाळेचे नाव उज्ज्वल करावे. विद्यार्थ्यांना दिलेली ही मदत म्हणजे समाजाप्रती आपले कर्तव्य.”



यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना अंधश्रद्धेविरोधी मार्गदर्शन करून जागरूकतेचा संदेश दिला. या उपक्रमासाठी विशेष पाठपुरावा केलेल्या माजी शिक्षक शशिकांत जाधव यांचे मुख्याध्यापक शिवराम साबळे यांनी कौतुक केले.

“पासलकर शाळेच्या प्रगतीत नेहमीच मोलाची भर घालतात,” अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे कवी रमेश तांबे, अशोक पासलकर, रघुनाथ यादव, प्राचार्य साबळे, तसेच जेष्ठ शिक्षक उपस्थित होते. कवी रमेश तांबे यांनी बालकवितांनी वातावरण रंगवले.

कार्यक्रमाचे परिचय ज्येष्ठ शिक्षिका ज्योत्स्ना गुरव यांनी केला. सूत्रसंचालन भगवान मदने यांनी केले तर आभार नूतन ओतुरकर यांनी मानले.फलकलेखन अपर्णा आढाव यांनी केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान आणि पालकांच्या डोळ्यातले आनंदाश्रू हेच या कार्याचे यश ठरले.

## जवळगाव–हत्तीज परिसरात दारूबंदीची जोरदार मागणी

- **८ डिसेंबरला पुणे आयुक्तालयासमोर उपोषण करण्याचा नागेश चव्हाण यांचा इशारा**

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

जवळगाव–हत्तीज परिसरात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या दारूविक्रीमुळे नागरिकांना दररोज त्रास सहन करावा लागत आहे. तरुण पिढी दारूच्या आहारी जात असून, घरगुती भांडणं वाढत आहेत, महिलांना असुरक्षित वाटत आहे आणि गावातील शांतता भंग होत आहे. या सर्व समस्यांमुळे नागरिकांमध्ये मोठी नाराजी आहे.



या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते नागेश चव्हाण यांनी दारूविक्रीविरोधात कडक भूमिका घेतली आहे. त्यांनी सांगितले की, “प्रशासनाने तातडीने दारूची दुकाने बंद केली नाहीत, तर आम्ही महिला भगिनींसह मोठं आंदोलन करू.” अनेक वर्षे ही समस्या चालू असून, तक्रारी केल्या तरी कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वर गुन्हे दाखल करून मोका अंतर्गत कारवाई करावी अशी मागणीही त्यांनी केली आहे.

नागेश चव्हाण यांनी याआधीही दारूबंदीची मागणी करत निवेदन दिले होते. त्या वेळी थोडी कारवाई झाली होती; मात्र काही दिवसांतच पुन्हा अवैध दारूविक्री सुरू झाली. त्यामुळे नागरिकांच्या सहनशीलतेचा बांध तुटला असून, आता निर्णायक लढा देण्याची तयारी सुरू आहे.

याअंतर्गत ८ डिसेंबर रोजी अवैध धंद्यांविरोधात पुणे आयुक्तालयासमोर उपोषण करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

याशिवाय मुख्यमंत्री कार्यालय, सोलापूर एसपी ऑफिस, वैराग पोलीस स्टेशन, बार्शी तहसील कार्यालय अशा विविध शासकीय कार्यालयासमोरही टप्प्याटप्प्याने धरणे आंदोलन करण्याची त्यांनी तयारी दर्शवली आहे. परिसरातील अनेक नागरिक, महिला व युवक चव्हाण यांच्या मागणीशी सहमत आहेत. दारूविक्रीमुळे समाजात बिघाड होत असल्याने, प्रशासनाने तातडीने कारवाई करून दारूची सर्व केंद्रे बंद करावीत, अशी एकमुखी मागणी स्थानिक पातळीवरून होत आहे. दारूबंदीच्या या लढ्यास परिसरात मोठा पाठिंबा मिळत असून, ८ डिसेंबरचे उपोषण हे या आंदोलनातील महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

## पेट फेड पुणे २०२५ चा उत्साहपूर्ण प्रारंभ !

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पेट फेड – भारतातील सर्वात मोठा पाळीव प्राणी महोत्सव आणि लिम्का वर्ल्ड रेकॉर्ड धारक ‘बिगेस्ट डॉग कार्निव्हल’ – याच्या ११व्या संस्करणाची रंगतदार सुरुवात आज पुण्यातील डेक्कन कॉलेज ग्राउंड येथे झाली. Royal Canin यांच्या प्रस्तुतत्वाखाली, Drools, Bowlers आणि Zepto यांच्या सहकार्याने आयोजित या महोत्सवात ११०० हून अधिक पाळीव प्राणी आणि अंदाजे ६५०० पाळीव प्राण्यांचे पालक व प्राणीप्रेमी सहभागी झाले, ज्यामुळे पहिला दिवस उत्साह, आनंद आणि समुदायभावनेने भरून गेला. सकाळपासूनच मास्टरक्लास अरेना, प्ले झोन, ॲजिलिटी रिंग, किटी प्ले पेन, कॅटॅपलूजा, दत्तक शिबिरे आणि १०० पेक्षा अधिक भारतीय व आंतरराष्ट्रीय ब्रँड्सच्या स्टॉल्सला मोठी गर्दी झाली. Walk & Wags, Fetch & Fumble, Trick Trail, Bug Buster, Wheel




of Woofs आणि Temptation Alley यांसारख्या स्पर्धांना विशेष प्रतिसाद मिळाला. दिवसातील सर्वात आकर्षक क्षणांपैकी एक म्हणजे Snout Scout च्या प्रियांका पाटकी यांच्या सहकार्याने आयोजित ‘Security & Obedience Dog Show’. यात व्यावसायिक वर्किंग डॉग्सची उन्नत ट्रेनिंग तंत्रे, टॅक्टिकल मूव्ज आणि सर्च डेमो पाहून पुणेकर मंत्रमुग्ध झाले.

## सिंहगड किल्ल्यावर गड संवर्धनाचा नववा टप्पा उत्साहात पार; हजारो स्वयंसेवकांचा सहभाग



**सिंहगड(दै. आरंभ पर्व)**

“गड जपा, इतिहास जपा – हीच खरी शिवसेवा!” या घोषणांनी दुमदुमलेल्या वातावरणात सिंहगड किल्ल्यावर गड संवर्धनाचा नववा टप्पा अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने २३ नोव्हेंबर २०२५ रोजी यशस्वीरीत्या पार पडला. आपला मावळा संघटनेच्या वतीने, लोकनेते खासदार निलेशजी लंके यांच्या संकल्पना व मार्गदर्शनातून हा भव्य उपक्रम राबवण्यात आला. सकाळी ७.०० वाजता सिंहगड पायथ्यावरून मोहिमेला सुरुवात झाली. किल्ल्याच्या माथ्यावर आणि आसपासच्या परिसरात कचरा निर्मूलन, तण काढणे, पाणवठ्यांची स्वच्छता, ट्रेक मार्गावरील अडथळे हटवणे आणि वृक्षलागवड या विविध उपक्रमांची मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी करण्यात आली. पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे निर्माण होणारे पर्यावरणीय भार लक्षात घेता हा उपक्रम किल्ल्याच्या संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला. गड संवर्धन मोहिमेला राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय नेतृत्वाचा भक्कम पाठिंबा लाभला. कार्यक्रमात मान्यवरांनी उपस्थित राहून स्वयंसेवकांना प्रेरित केले. खासदार सुप्रिया सुळे, आमदार शशिकांत शिंदे – प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष), आमदार जयंत पाटील – माजी मंत्री,खासदार निलेश लंके – उपक्रमाचे संकल्पक प्रशांत जगताप – माजी महापौर यांस बरोबर काकासाहेब चव्हाण,अनितातार्इ इंगळे. सुधाकर गायकवाड, नंदकुमार जावळकर, प्रमोद जावळकर,नंदू मते. सुभाष हगवणे. राजेंद्र चावट, भाऊसाहेब हगवणे, शहाजी हगवणे, काळूराम हगवणे. पद्माकर लायगुडे, सुरेखातार्इ दमिष्टे, रोहित नलावडे अदि मान्यवरांनी प्रत्यक्ष कचरा संकलनात हातभार लावत मोहिमेला सामाजिक संदेश दिला.

# गोकुळनगर : निलेश गिरमे यांच्याकडून मोफत भाजीवाटप

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक 34 मधील नागरिकांसाठी संकल्प प्रतिष्ठान युवासेना अध्यक्ष निलेश गिरमे यांनी मोफत भाजीवाटपाचा सुंदर उपक्रम सुरू केला आहे.

या भाजीवाटपचे 17 वे सत्र गोकुळनगर नऱ्हे येथे पार पडले. मोठी रांग लावत भाजी घेत हजारो नागरिक आणि महिलांकडून खूप मोठा प्रतिसाद मिळाला.

रविवार, दि. 23नोव्हेंबर रोजी गोकुळ नगर येथील शिवपर्वती मंगल कार्यालय येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




कापडी पिशवी घेऊन आलेल्या महिलांना ताज्या भाज्या मोफत देण्यात आल्या. हजारो नागरिकांना मोफत भाजीवाटप करण्यात आले..

संकल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष निलेश गिरमे, उपाध्यक्ष राधिकातार्इ गिरमे, यांच्यासह कार्यकर्त्यांनी यावेळी नागरिकांना भाजीवाटप केले..

निलेश गिरमे म्हणाले, “हा उपक्रम फक्त आजपुरता नाही. प्रत्येक महिन्याच्या रविवारी प्रभाग क्रमांक 34 मधील वेगवेगळ्या भागात आम्ही मोफत भाजीवाटप करू. शेतकरी बांधवांचा सन्मान आणि जनतेची मदत हेच आमचं उद्दिष्ट आहे.आगामीकाळात प्रभागातील विविध भागांमध्ये हा उपक्रम आयोजित केला जाणार आहे. प्रभागातील सर्व माता-भगिनी व नागरिकांनी लाभ घ्यावा”

गिरमे यांच्या या उपक्रमाचे नागरिकांनी मनापासून कौतुक केले.जनतेसाठी नेहमी पुढे राहणारा गिरमे परिवार यानिमित्त पुन्हा एकदा लोकांच्या चर्चेत आला आहे.

नागरिकांच्या हितावह काम करत असलेल्या निलेश गिरमे यांचे आलेल्या माता भगिनींनी तोंड भरून कौतुक केले. माणुसकी आणि सेवा हाच खरी राजकारणाचा मार्ग आहे. हे या माध्यमातून गिरमे यांनी दाखवून दिले आहे.

या कार्यक्रमासाठी संकल्प प्रतिष्ठानच्या राम तोडकरी मनोज चव्हाण प्रशांत जाधव चेतन कौंद्रे विनोद राठोड अदित्य बैकर भूषण वाघमारे गणेश राठोड सोरभ जगताप लोकेश राठोड ह्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### प्रभाग ३० मध्ये मोफत Wi-Fi सेवेला प्रारंभ

पुणे (आरंभ पर्व) : कर्वेनगर-हिंगणे होम कॉलनी परिसरातील नागरिकांसाठी डिजिटल सोयींचा नवा अध्याय सुरू झाला आहे. कर्वेनगर चौकासह एकूण पाच ठिकाणी मोफत Wi-Fi सेवेला आज शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन शहराध्यक्ष मा. प्रशांतदादा जगताप, मा. नगरसेविका लक्ष्मीवहिनी दुधाने, युवा नेते स्वप्नीलभाऊ दुधाने तसेच पुणे शहर युवक अध्यक्ष किशोरभाऊ कांबळे यांच्या हस्ते संपन्न झाले. उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन श्री. विष्णुपंत सरगर व सौ. सुनिता सरगर यांनी केले होते. या प्रसंगी विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोफत Wi-Fi उपलब्ध झाल्याने परिसरातील विद्यार्थी, व्यावसायिक व नागरिकांना डिजिटल सुविधा सहज उपलब्ध होणार असल्याची प्रतिक्रिया स्थानिकांनी व्यक्त केली.

### मालखेड ग्रामस्थांसाठी मोठी सुवर्णसंधी!

- सरपंच नंदाताई लालदास जोरी यांचे नागरिकांना आवाहन

मालखेड (आरंभ पर्व) : शासनाच्या मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियानांतर्गत मालखेड ग्रामस्थांसाठी एक मोठी आणि दिलासादायक घोषणा करण्यात आली आहे. निवासी मालमत्ता कराच्या थकबाकीदारांना आता थकबाकी भरताना 50% सवलत मिळणार असल्याची माहिती सरपंच नंदाताई लालदास जोरी यांनी दिली. ग्रामस्थांना दिलेल्या आवाहनात त्यांनी सांगितले की, "ग्रामपंचायतीकडे असलेली चालू बाकी संपूर्ण भरा आणि मागील घरपट्टी (पाणीपट्टी सोडून) फक्त 50% भरून उर्वरित 50% सवलत मिळवा. शासनाने दिलेली ही संधी प्रत्येक नागरिकाने नक्कीच वापरावी," असे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार निवासी मालमत्ता करातील थकबाकीदारांना दिल्या जाणाऱ्या या सवलतीमुळे मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थांना आर्थिक दिलासा मिळणार असून, गावाच्या महसुलातही सकारात्मक वाढ होणार आहे. ग्रामपंचायत प्रशासनाकडूनही नागरिकांना सहकार्य करण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी ग्रामस्थांनी ग्रामपंचायत मालखेड कार्यालयात तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. घरपट्टीवर तब्बल 50% सवलत – संधी दवडू नका! मालखेड ग्रामपंचायतीच्या या उपक्रमामुळे ग्रामविकासाला नवे प्रोत्साहन मिळेल, असा विश्वासही सरपंच नंदाताई जोरी यांनी व्यक्त केला.

### थोपटे गेले आणि गड कोसळला!

- ५० वर्षांच्या सत्तेनंतर भोर नगरपालिकेत काँग्रेसला एकही उमेदवार नाही

भोर (आरंभ पर्व) : स्थानिक राजकारणातील अतिशय मोठा भूकंप मानला जाणारा निर्णय आज समोर आला आहे. तब्बल ५० वर्षांपासून भोर नगरपालिकेवर सलग सत्ता गाजवणाऱ्या काँग्रेस पक्षाचा गड अखेर कोसळला असून, आगामी निवडणुकीत काँग्रेसकडून एकही उमेदवार मैदानात नाही, ही धक्कादायक बाब नागरिक आणि कार्यकर्त्यांमध्ये तीव्र चर्चेचा विषय ठरत आहे. थोपटे कुटुंबाचा भोर तालुक्यातील प्रभाव, त्यांची संघटनशक्ती आणि दीर्घकाळ टिकलेले वर्चस्व लक्षात घेता काँग्रेसचा हा अचानक गायब झालेला 'शून्य' सहभाग अनेक प्रश्न निर्माण करतो. स्थानिक पातळीवर गेल्या काही महिन्यांत वाढलेले राजकीय पेचप्रसंग, अंतर्गत मतभेद, समन्वयाचा अभाव आणि गटबाजी या कारणामुळेच हा ऐतिहासिक पराभव घडल्याची चर्चा आहे. दरम्यान, विरोधी पक्षांनी काँग्रेसच्या अनुपस्थितीवर निशाणा साधत "थोपटे गेले आणि गडच कोसळला" अशी टीका केली आहे. भोर शहरातील नागरिकांमध्येही यावरून मिश्र प्रतिक्रिया उमटत असून, अर्धशतकभर सत्ता भोगल्यानंतर अचानक रिकामे झालेले राजकीय मैदान नेमके कोण भरेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आगामी काही दिवसांत विविध पक्षांचे उमेदवार जाहीर होतील आणि नवीन समीकरणे उघड होतील. मात्र काँग्रेसच्या अनुपस्थितीमुळे भोर नगरपालिकेतील ही निवडणूक ऐतिहासिक वळणावर पोहोचली आहे, हे मात्र निश्चित.

# माजी आमदार संग्राम थोपटे यांच्यावर आमदार मांडेकरांची सडकून टीका



**भोर (दै. आरंभ पर्व)**

स्थानिक राजकारणात तापलेल्या वातावरणात भोरच्या सभेत आमदार मांडेकर यांनी माजी आमदार संग्राम थोपटे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. "२१/० होणार आहे तर मंत्र्यांना कशाला घेऊन येतो? ये की एकटा! कर की प्रचार! घे मायक्रोफोन, ठोक भाषण!" अशा शब्दांत मांडेकरांनी थोपटे यांच्यावर थेट टीका केली.

भोर मतदारसंघातल्या प्रचारसभेत बोलताना त्यांनी पहिल्या दिवसापासूनच थोपटे यांना मंत्र्यांची साथ लागते यावरून टोलाही लगावला.

"पहिल्या दिवशीच कॅबिनेटचा मंत्री लागतो त्यांना... स्वतः उभं राहून बोलण्याची हिंमत नाही!" असे म्हणत त्यांनी थोपटे यांच्या नेतृत्वक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले.

भोरमध्ये झालेल्या सभेला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. मांडेकरांच्या आक्रमक भूमिकेमुळे सभेत काही क्षण टाळ्यांचा आणि घोषणांचा जोरदार प्रतिसाद उमटला. विरोधकांवर टीका करताना मांडेकरांनी स्थानिक प्रश्नांवरही थेट भाष्य केले व विकासकामांच्या नावावर फसवणूक केल्याचा आरोप थोपटे यांच्यावर ठेवला. मांडेकर म्हणाले, "आम्हाला प्रचारासाठी कुठले मंत्री, कॅबिनेटची मदार लागत नाही. आम्ही एकटे आलो, एकटे लढलो, आणि जनता आमच्या पाठीशी उभी राहिली तर विजय नक्की आहे."

यातून त्यांनी थोपटे यांचा अप्रत्यक्ष उल्लेख करत त्यांच्या राजकीय शैलीवर निशाणा साधला.

मांडेकरांच्या या वक्तव्यावर थोपटे गटात चर्चेला ऊत आला असून, लवकरच यासोबत थोपटे किंवा त्यांच्या समर्थकांकडून उत्तर येण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे.

### भोरमध्ये राजकीय वातावरण चुरशीचे

**निवडणुकीची सावट जवळ येत असताना भोर तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. एकीकडे मांडेकर समर्थक आक्रमक प्रचार करत आहेत, तर दुसरीकडे थोपटे गटही सभा, मेळावे आणि दररोजच्या भेटींमधून जनसंपर्क वाढवत आहे. दोन्ही बाजूंकडून टीका-टिप्पणी तीव्र होत असून सामना आता अधिक चुरशीचा होत चालल्याचे चित्र स्पष्ट दिसते.**

## रेमेडियम लाइफकेअरचा धमाकेदार परफॉर्मन्स

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

फार्मा आणि स्पेशॅलिटी केमिकल क्षेत्रात कार्यरत रेमेडियम लाइफकेअर लिमिटेडने सप्टेंबर-2025 अखेर संपलेल्या दुसऱ्या तिमाहीचे तसेच अर्धवार्षिक निकाल जाहीर करत प्रभावी प्रदर्शन केले आहे. कंपनीच्या मते, परिचालन कार्यक्षमता, पोर्टफोलिओची मजबुती आणि विस्तार धोरण यांनी आर्थिक निकालांना नवे उंचीमान दिले आहे.


30 सप्टेंबर 2025 ला संपलेल्या तिमाहीत एकत्रित आर्थिक निकालांनी मजबूत ऑपरेशनल गती दर्शवली. परिचालन कार्यांमधून एकूण एकत्रित आवक 11,105.82 लाख रुपये झाली, तर एकूण आवक 11,431.25 लाख रुपये झाली.

या तिमाहीत करापूर्वीचा एकत्रित नफा 1,043.69 लाख रुपये तर करानंतरचा नफा 862.34 लाख रुपये झाला. प्रति शेअर उत्पन्न 0.10 रुपये होते, जे वित्तीय वर्ष 2025-26 च्या पहिल्या तिमाहीपेक्षा दुप्पट आहे.

## ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने सादर केले भारत के सुपर फाउंडर्स

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

ॲमेझॉन एमएक्स प्लेअर या ॲमेझॉनच्या विनामूल्य व्हिडिओ स्ट्रीमिंग सर्व्हिसतर्फे भारत के सुपर फाउंडर्स या भारताच्या स्टार्टअप मनोरंजन क्षेत्रात महत्त्वाचा टप्पा ठरणाऱ्या हाय-स्टेक्स असलेल्या उद्योजकीय रिॲलिटी सीरिजचे अनावरण करण्यात आले आहे. ही सीरिज भारतातील स्टार्टअप एंटरटेनमेट क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा आहे. सुनील शेट्टी या शोचे सूत्रसंचालक व मार्गदर्शक असून या शोच्या निमित्ताने देशातील काही उदयोन्मुख फाउंडर्स एकत्र येणार आहेत आणि प्रख्यात बिझनेस टायकून्ससमोर ते आपल्या कल्पना




मांडतील. या बिझनेस टायकून्सनी रिकर क्लबसोबत संयुक्तपणे भारताच्या स्टार्टअपच्या स्वप्नाला निधी पुरविण्यासाठी ₹100 कोटींची तरतूद केली आहे. यामुळे, भारतीय मनोरंजन प्लॅटफॉर्मवर दाखवण्यात आलेली ही आतापर्यंतची सर्वात मोठी एकत्रित गुंतवणुकीची रक्कम ठरते. अस्सलपणा, पारदर्शकता आणि उद्योजकतेच्या प्रवासाबद्दल असलेला आत्यंतिक आदर असलेल्या या फॉरमॅटमध्ये भारत के सुपर फाउंडर्समध्ये प्रत्येक बिझनेस पिच हे व्हेरिफाय केलेली माहिती, विश्वसनीय डेटा आणि बिझनेस चालविण्यासाठी आवश्यक असलेली खरी, मूलभूत तत्वे यांचा आधार असेल याची खातरजमा करण्यात येते. या शोमध्ये करण्यात येणारे करार खऱ्या गुंतवणुकीच्या उद्देशावर आधारित आहेत. त्यामुळे निर्णयप्रक्रिया स्पष्ट, पारदर्शक व जबाबदारीपूर्ण असते. या वैशिष्ट्यांमुळेच भारत के सुपर फाउंडर्स हा शो इतर कोणत्याही उद्योजकीय रिॲलिटी शोपेक्षा अनोखा ठरतो. या शोच्या नावाप्रमाणेच यात वैविध्य, आव्हानांवर मात करून पुन्हा भरारी घेण्याची क्षमता आणि देशातील प्रत्येक कानाकोपऱ्यातील उद्योजकाची महत्त्वाकांक्षा यांचे कौशल्य साजरे करण्यात आले आहे आणि या ठिकाणी सुपरफाउंडर्स सर्वात महत्त्वाचे असतात. ज्या व्यक्तींच्या कल्पना, धारणा आणि चिकाटीमध्ये अर्थपूर्ण बदल घडविण्याची क्षमता आहे, अशा व्यक्तींची दखल घेण्यात येते. या ध्येयाला बळ देणारी देशातील काही सर्वात प्रभावशाली उद्योगपतींची बलाढ्य टीमही शोमध्ये सहभागी आहे.

## प्रभाग क्रमांक ३४ मध्ये सर्वसमावेशक विकासाचे ध्येय

### सौ. कोमलताई सुशांत कुटे






**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धायरी – नऱ्हे – वडगाव खुर्द परिसरामध्ये वाढत्या समस्या, वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि विकासाचा दबाव पाहता प्रभाग क्रमांक ३४ मध्ये लोकाभिमुख नेतृत्वाची गरज अधोरेखित होते. या पार्श्वभूमीवर मिशन महानगरपालिका सदरामध्ये संवाद साधताना भाजप महिला मोर्चा शहर सरचिटणीस सौ. कोमलताई सुशांत कुटे यांनी प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी सज्ज असल्याचा संदेश दिला.

उच्चशिक्षित, संवेदनशील आणि सामाजिक जाण असलेल्या कोमलताई यांनी महिलांसाठी विविध उपक्रम, स्पर्धा, कौशल्यविकास कार्यक्रम, आरोग्य तपासणी शिबिरे,सेवा शिबिरे आणि सामाजिक-सांस्कृक उपक्रम राबवत महिलांच्या मनात आपले विशेष स्थान निर्माण केले आहे.

नऱ्हे व परिसरात त्यांनी पुणे महानगरपालिका व आमदार भीमराव तापकीर यांच्यामार्फत रस्ते कॉंक्रिटीकरन करणे, नवीन ड्रेनेज लाईन, पथदिवे बसवणे,रस्ता रुंदीकरण, ओपन जिम, बससेवा सुरू करणे, नवीन पाण्याच्या लाईन टाकणे अशी विविध विकासकामे ही मार्गी लावली आहेत. कोविड काळातील त्यांच्या कामगिरी बद्दल परिसरातील नागरिक अवश्य आठवण करून देतात.

त्यांचा मनमोकळा संवाद, तत्परता आणि लोकांशी बांधिलकी यामुळे त्या प्रभागातील महिला वर्गाच्या विश्वासाच्या केंद्रस्थानी आहेत.

संवादात त्यांनी सांगितले— "वाहतूक कोंडी, ड्रेनेज समस्या, अस्वच्छता, पाणीपुरवठा , शाळा, अंगणवाड्या, अशा विविध भौतिक सुविधा यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. मनपा पातळीवरील सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि तांत्रिक उपाययोजनांच्या साहाय्याने आम्ही या समस्या दूर करू."

विशेष म्हणजे, खडकवासला मतदारसंघाचे आमदार आ. भीमराव तापकीर यांच्याशी तसेच वरिष्ठ नेतृत्वाशी कोमलताईंचे अत्यंत चांगले संबंध आहेत. त्यामुळे प्रभागातील कोणतेही विकासकाम पुढे नेण्यासाठी समन्वय आणि सहकार्याची मजबूत पायाभरणी त्यांच्याजवळ आहे.

नऱ्हे–धायरी–वडगाव परिसरातील रस्ते, वाहतूक नियोजन, सांडपाणी व्यवस्थापन आणि मूलभूत सुविधांबाबत त्यांनी स्पष्ट भूमिकेसह भविष्यातील दिशा मांडली. त्यांच्या उपक्रमशीलतेमुळे आणि सामाजिक सहभागामुळे अनेक कुटुंबांपर्यंत मदत व सेवा पोहोचली आहे.

राजकीय आणि सामाजिक वर्तुळात असे मत व्यक्त केले जाते की— "सक्षम, उच्चशिक्षित आणि संघटनेत सक्रिय असलेल्या भाजप महिला मोर्चा शहर सरचिटणीस सौ. कोमलताई कुटे या प्रभाग क्रमांक ३४ मध्ये भाजपला मोठी बळकटी देऊ शकतात."

सौ. कोमलताई कुटे या त्यांच्या संवेदनशील नेतृत्वामुळे, महिलांसाठी केलेल्या कार्यामुळे आणि विकासाभिमुख दृष्टीकोनामुळे प्रभाग ३४ मधील उदयोन्मुख, आश्वासक आणि प्रभावी नेतृत्व म्हणून वेगाने पुढे येत आहेत.



## ऊस आंदोलन पेटले; गव्हाणीत उड्या मारून कारखाना पाडला बंद

**वैराग (दै. आरंभ पर्व)**

शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांचे नेतृत्वाखाली 20 नोव्हेंबर रोजी ऊसाला पहिली उचल 4000 द्या व दर जाहीर केल्याशिवाय राज्यातील साखर कारखान्यांनी उसाचे गाळप करू नये यासह विविध मागण्यांसाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना विविध कारखाने, पोलीस स्टेशन व तहसील कार्यालया मार्फत निवेदने पाठवली होती. त्या निवेदनात ऊसाची ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या, काटा मारणाऱ्या तसेच ऊस दर जाहीर न केलेल्या व मागील ऊस बिले थकीत असलेल्या कारखान्यांवर दिनांक 23 नोव्हेंबर पासून आंदोलने करणार असल्याचे जाहीर केले होते, त्याप्रमाणे आज बार्शी तालुक्यातील निमजाई कारखान्याच्या गव्हाणीत उतरून ठिय्या मांडत कारखाना बंद करण्यात आला. त्यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष विजय रनदेवे, बार्शी तालुका अध्यक्ष हनुमंत कापसे, उमेश यादव, मुसा मस्के, दत्ता कापसे, तानाजी कापसे, ज्ञानेश्वर पवार, विजय पवार, नारायण डिसले, बालाजी डिसले, किसन डिसले, दयानंद ढेंगळे, नितीन कापसे, प्रदीप पाटील आदींसह शेतकरी उपस्थित होते.

यावेळी गायकवाड म्हणाले की, ऊस उत्पादनाचा खर्च गगनाला भिडलेला असताना कारखानदार मात्र शेतकऱ्यांचा ऊस फुकट भावात लुटत आहेत ते तात्काळ थांबवा अन्यथा वैतागलेला शेतकरी कारखाने पेटवल्याशिवाय राहणार नाही असा खणखणीत इशाराही यावेळी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना गायकवाड यांनी दिला.

# सिंहगडावर 'आपला मावळा'ची स्वच्छता मोहीम

## खासदार नीलेश लंके यांच्या पुढाकाराने शेकडो शिवभक्तांचा सहभाग



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड किल्ल्यावर 'आपला गड, आपली जबाबदारी' या उपक्रमांतर्गत भव्य स्वच्छता आणि संवर्धन मोहीम राबवण्यात आली. खासदार नीलेश लंके यांच्या पुढाकारातून आयोजित या मोहिमेत राज्यातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या शेकडो शिवभक्तांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. "गड-किल्ल्यांचे संवर्धन ही आपली जबाबदारी आहे. मी खासदार म्हणून नव्हे, तर शिवरायांचा मावळा म्हणून या मोहिमेत सहभागी आहे," असे खासदार लंके यांनी यावेळी सांगितले. सकाळी नरवीर सुभेदार तानाजी मालुसरे समाधीस्थळावर जिजाऊ वंदना आणि संवर्धन प्रतिज्ञेनंतर मोहिमेला सुरुवात झाली. त्यानंतर गडावरील २१ पथकांनी एकाच वेळी विविध ठिकाणांची स्वच्छता केली. कल्याण दरवाजा, पुणे दरवाजा, पुरुष बालेकिल्ला, राजाराम महाराज समाधी परिसर, तानाजी मालुसरे समाधी परिसर अशा प्रमुख ठिकाणी प्लास्टिक, काच, कागद, काटेरी झुडपे, वाळलेले गवत काढण्यात आले. पायवाटा खुल्या करण्यात आल्या. या मोहिमेत माजी महापौर व राष्ट्रवादी काँग्रेस

**स्वयंसेवक व सहभागींची संपूर्ण व्यवस्था धारेश्वर विद्या आणि क्रीडा प्रतिष्ठानचे कार्यकारी अध्यक्ष अनिकेत चव्हाण यांनी केली. भोजनाची व्यवस्था दीपक खिरीड यांनी गोरे बुद्रुक येथील धर्माजी बाबा मंदिर परिसरात केली. आपला मावळा संघटनेच्या माध्यमातून गेल्या काही महिन्यांपासून दर महिन्याच्या एका रविवारी विविध किल्ल्यांवर स्वच्छता आणि संवर्धन मोहिमा राबवण्यात येत आहेत. शिवनेरी, रायरेश्वर, भुदरगड, धर्मवीर गड, तिकोना, येथेही यापूर्वी अशीच मोहीम पार पडली आहे.**



पुणे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप, राष्ट्रवादी काँग्रेस खडकवासला मतदारसंघाचे अध्यक्ष व माजी नगरसेवक काकासाहेब चव्हाण, पुणे जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या अनिताताई इंगळे, सुरेखाताई दमिष्टे , इतिहास संशोधक डॉ. नंदकिशोर मते, पंचायत समितीचे माजी सदस्य दत्ता जोरकर, पद्माकर लायगुडे निलेश द मिस्टेक दीपक खिरीड अनिकेत चव्हाण वरीष्ठ पोलिस निरीक्षक वैशाली पाटील, वनपरिमंडळ अधिकारी समाधान पाटील, वनरक्षक बळीराम वायकर , सामाजिक कार्यकर्ते तात्यासाहेब इंगळे,'आपला मावळा' संघटनेचे अध्यक्ष रामेश्वर निमसे, यांसह नगर, सातारा, सांगली आणि पुण्यातील शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### हायब्लिस सोसायटीच्या नावफलक व सण रेसिडेन्सी रस्त्याचे भव्य उद्घाटन

- लोकप्रिय आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या हस्ते कार्यक्रम संपन्न

खडकवासला (आरंभ पर्व) : खडकवासला विधानसभा परिसरात विकासकामांना गती मिळत असून, आज हायब्लिस सोसायटीच्या नावफलकाचे उद्घाटन तसेच सण रेसिडेन्सी सोसायटी येथील रस्त्याचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. या दोन्ही महत्वपूर्ण कामांचे लोकार्पण लोकप्रिय आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी प्रभागातील विविध मान्यवरांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमास स्वीकृत नगरसेवक गंगाधर भडावळे, युवा नेते सारंग नवले, बाळासाहेब नवले, नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, किशोर पोकळे, यशवंत लायगुडे, कोमल सुशांत कुटे, तुषार पोकळे तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. सोसायटीतील नागरिकांनी आमदार तापकीर यांचे मन:पूर्वक स्वागत करत क्षेत्रातील विकासकामांबद्दल समाधान व्यक्त केले. नव्या रस्त्यामुळे वाहतुकीची सोय सुधारेल तसेच सोसायटीचा सौंदर्यवाढीस हातभार लागेल, असा विश्वास रहिवाशांनी व्यक्त केला. समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला असून, आगामी काळात आणखी विकासकामे राबविण्याचे आश्वासन आमदारांनी उपस्थितांना दिले.

### मान्यवरांच्या उपस्थितीत 'असंभव'चा शानदार प्रीमियर सोहळा





पुणे (आरंभ पर्व) : 'मुंबई पुणे फिल्म्स एंटरटेनमेंट' निर्मित आणि एंटरटेन टेलिव्हिजन्स, पी अँड पी एंटरटेनमेंट सह निर्मित 'असंभव' या चित्रपटाचा ग्रँड प्रीमियर शुक्रवार, २३ नोव्हेंबर रोजी कोथरूड येथील सिटी प्राईड चित्रपटगृहात उत्साहात पार पडला. चित्रपटाच्या टीमच्या उपस्थितीत हा विशेष सोहळा पार पडला. चित्रपटातील प्रमुख कलाकार, तांत्रिक चमू, निर्माते व मुरली डायनिंग चे सर्वेसर्वा संतोष विठ्ठल मुंडे तसेच ब्लॉगर रितेश बालाजी दहिफळे आणि आमंत्रित मान्यवर यांच्या उपस्थितीमुळे प्रीमियरला विशेष आकर्षण प्राप्त झाले. उपस्थित प्रेक्षकांनी कथा, सादरीकरण आणि भावस्पर्शी मांडणीला दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे प्रीमियर सोहळा अधिक रंगतदार झाला. या निमित्ताने कलाकारांनी प्रेक्षकांशी संवाद साधत निर्मिती प्रवास, विषयाची मांडणी आणि अनुभव याबद्दल भावना व्यक्त केल्या. प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या गजरात आणि सकारात्मक प्रतिसादात कार्यक्रमाची सांगता झाली. 'असंभव' हा चित्रपट आता सर्वत्र प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.




### हायब्लिस सोसायटी नामकरण व काँक्रिट रस्त्याचे लोकार्पण

धायरी (आरंभ पर्व) : धायरी परिसरातील हायब्लिस सोसायटीचे नामकरण आणि उद्घाटन माजी स्वीकृत सदस्य गंगाधर भडावळे यांच्या प्रयत्नातून उत्साहात पार पडला. याच कार्यक्रमात धायरीतील सन रेसिडेन्सी परिसरातील सिमेंट काँक्रिट रस्त्याचे लोकार्पणही करण्यात आले. या विकासकामांसाठी लागणारा आवश्यक निधी आमदार भीमराव तापकीर यांनी उपलब्ध करून दिला आहे, गंगाधर भडावळे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे ही कामे पूर्ण झाली आहेत. हा कार्यक्रम आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाला धायरी परिसरातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, माजी नगरसेवक हरिदास चरवड, माजी नगरसेवक बाळासाहेब नवले, माजी नगरसेविका निता दांगट,भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे, प्रभाग अध्यक्ष पै. तुषार पोकळे, सारंग नवले, कोमल सुशांत कुटे, जयश्री पोकळे आणि गणेश पोकळे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला अधिक उत्साह दिला. या रस्त्यामुळे धायरी परिसरातील वाहतूक आणि दैनंदिन हालचाल सुलभ होणार असून, सोसायटी नामकरणामुळे स्थानिकांना एक नवीन ओळख प्राप्त झाली आहे. रहिवाशांनी या विकासकामांचे स्वागत करत आमदार तापकीर आणि गंगाधर भडवळे यांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले.

### सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटला पुरस्कार जाहीर



पुणे (आरंभ पर्व) : शिक्षण क्षेत्रातील अग्रणी असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांनी समाज स्वतःचे अढळ स्थान निर्माण करणाऱ्या पुणे येथील सूर्यदत्ता ग्रुप ओफ इन्स्टिट्यूट या शिक्षण संस्थेस अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचा यंदाचा महात्मा फुले राष्ट्रीय आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार जाहीर झाला आहे याची घोषणा साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.शरद गोरे यांनी केली आहे या पुरस्काराचे वितरण पुणे येथील महात्मा फुले सांस्कृतिक भवन येथे २३ नोव्हेंबर रोजी संपन्न होणाऱ्या १९ व्या अखिल भारतीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलनात होणार आहे, सूर्यदत्ता शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.संजय चोरडिया यांनी समाजातील गरीब विद्यार्थ्यांना सदोदित शिक्षणासाठी मोठी मदत केली आहे गेली अनेक दशके त्यांचे हे कार्य अविरतपणे सुरू आहे याच कार्याची दखल घेऊन त्यांच्या शिक्षण संस्थेची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

# प्रभागातील जनतेची सेवा करण्यासाठी सज्ज

## निलेश राधिका दशरथ गिरमे

## जनतेच्या खूप अपेक्षा आहेत त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार : गिरमे







निलेश राधिका दशरथ गिरमे. मिशन महानगरपालिका सदरामध्ये संवाद साधताना त्यांच्या भूमिकेतून

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग ३४ (नऱ्हे–धायरी–वडगाव) मधील वाढत्या अपेक्षा, नागरिकांच्या समस्या आणि सामाजिक कार्याच्या जोरावर उभं राहिलेलं एक महत्त्वाचं नाव म्हणजे स्पष्ट दिसतं की समाजकारण हेच त्यांचं खरं ध्येय आहे.

निलेश गिरमे हे पुणे शहर युवासेनेचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. यासोबतच राज्य शासनाने स्थापन केलेल्या भिडे वाडा शासन नियुक्त समितीचे ते अध्यक्ष म्हणूनही ते कार्यरत आहेत. दोन्ही पदांवर काम करत असूनही ते नेहमी जनतेमध्ये, लोकांच्या समस्यांमध्ये आणि सामाजिक कामांमध्ये सक्रिय असतात. शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथभाई शिंदे यांच्या "80% समाजकारण – 20% राजकारण" या तत्त्वावर निलेश गिरमे ठामपणे काम करतात. कोणत्याही सणासुदीच्या कार्यक्रमापासून ते संकटग्रस्त परिस्थितीपर्यंत लोकांसोबत उभं राहण्याची त्यांची वृत्ती प्रभागात सर्वत्र दिसून येते.

कोरोनाच्या कठीण काळात धान्य वाटप, महागाईच्या काळात स्वस्त दरात दिवाळी साहित्य देणं, महिलांसाठी मोठे रक्षाबंधन सोहळे, तसेच मोफत भाजीपाला वाटप या सर्व कामांनी लोकांच्या घराघरात त्यांचा आदर आणि प्रेम वाढवलं आहे. संकल्प प्रतिष्ठानच्या माध्यमातून शिक्षण आणि समाजहितासाठी त्यांनी सतत उपक्रम राबवले आहेत.

निलेश गिरमे सांगतात "मी आधी समाजासाठी आहे. पदं आहेत, जबाबदाऱ्या आहेत... पण माझ्या प्रभागातील माणूस सुखी असला पाहिजे. आणि त्यामुळेच नगरसेवक म्हणून लोकांसाठी लढण्याचा माझा मानस आहे."

त्यांच्या या भावनेला प्रभागातील नागरिकांनीही मोठा प्रतिसाद दिला आहे. अनेक महिला, वृद्ध, युवक यांच्याकडून त्यांना सतत आशीर्वाद मिळत आहेत.

"गिरमे यांच्यासारखा सर्वांच्या घरात उतरणारा नेता नगरसेवक प्रभागाला लाभला, तर विकास थांबणार नाही." अशी भावना व्यक्त होत आहेत

मिशन महानगरपालिका सदरामध्ये झालेल्या या संवादातून हे स्पष्ट जाणवतं की निलेश गिरमे हे समाजकारणावर आधारित नेतृत्वाचं खरे उदाहरण आहेत. आगामी निवडणुकीत त्यांना संधी मिळाल्यास प्रभाग ३४ मध्ये ते नक्कीच लक्षवेधक कामगिरी करतील, व पुणे महानगरपालिकेमध्ये नगरसेवक होतील असा विश्वास अनेक नागरिकांनी व महिला भगिनींनी व्यक्त केला आहे.

## जुगार अड्ड्यांना अभय! पोलिसांची मौन भूमिका; प्रचंड संताप

**खेडशिवापूर (दै. आरंभ पर्व)**

कोंढणपूर फाटा परिसरात जुगार अड्ड्यांचे जाळे दिवसेंदिवस अधिक घट्ट होत असून, संपूर्ण भाग 'नो टेन्शन झोन' असल्यासारखा बेफामपणे चालणाऱ्या जुगार व्यवसायामुळे बदनाम होऊ लागला आहे. जुगारचं राज्य आणि पोलिस गप्प – अशीच परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा स्थानिकांनी मध्ये होत आहे. संध्याकाळीनंतर या भागात खुलेआम जुगार खेळला जात असल्याचे दृश्य सहज पाहायला मिळते. बाहेरून येणाऱ्या संशयित गटांची वाढती वर्दळ, वाहनांची गर्दी आणि रात्री उशिरापर्यंत सुरू असणाऱ्या हालचालींमुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. रहिवाशांनी वारंवार तक्रारी करूनही पोलीस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. जुगार अड्ड्यांना जणू कोणाचाच डर नसल्यासारखे वातावरण तयार झाले असून, त्याचा परिणाम तरुण पिढीवरही होत असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

## फुरसुंगी : नगराध्यक्ष पदासाठी अपक्ष उमेदवाराचा अधिकृत प्रवेश

**फुरसुंगी (दै. आरंभ पर्व)**

आगामी नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीने आपली ताकद वाढवण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. फुरसुंगी नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी अपक्ष म्हणून अर्ज भरलेल्या उमेदवाराला वंचित बहुजन आघाडीत अधिकृतपणे प्रवेश देण्यात आला आहे.

हा प्रवेश रीतसर पत्राद्वारे देण्यात आला असून, या प्रक्रियेसाठी आणि उमेदवाराला पक्षात सामावून घेण्यासाठी निरीक्षक उत्तम वनशिव, तालुका हवेली अध्यक्ष बाळासाहेब भालेराव, तसेच माजी सैनिक आघाडीचे सर्वेसर्वा सिद्धार्थ उगले यांचे विशेष प्रयत्न यशस्वी ठरले.

या प्रवेशामुळे फुरसुंगी नगरपरिषद निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी अधिक मजबूत होणार असून, स्थानिक राजकारणात नवे समीकरण निर्माण होण्याची शक्यता आहे. पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि हवेली तालुक्यातील वंचित समर्थकांमध्ये या घडामोडीबद्दल उत्साहाचे वातावरण आहे.

दरम्यान, पक्ष नेतृत्वाने नव्या उमेदवाराचे स्वागत करत वंचित बहुजन आघाडीचा वाढता प्रभाव, संघटनशक्ती आणि नव्या नेतृत्वाचा उदय हेच पक्षाच्या विस्ताराचे प्रमुख कारण असल्याचे सांगितले. फुरसुंगी नगरपरिषदेतील निवडणूक आता अधिक रंगतदार होणार, असे स्पष्ट संकेत या प्रवेशामुळे मिळत आहेत.

### खडकवासला मतदार संघात वंचित आघाडीचे काम वाड्या- वस्त्यांवर

**खडकवासला विधानसभा मतदार संघात ही रांजेद्र सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली वंचित बहुजन आघाडीचे काम पदाधिकारी यांच्या समावेत अधिक प्रभावी चालले आहे . नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती या निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर सोनवणे यांनी पक्षाचे व बाळासाहेब आंबेडकर यांचे विचार वाड्या वस्त्यावर पोचवण्यात यशस्वी झाले आहेत.**

## 'नो आयडी, नो एंट्री' – महापालिकेत कडेकोट अंमलबजावणी

- अधिकारी व कर्मचारी ओळखपत्राशिवाय आत येणार नाहीत




**खडकवासला(दै. आरंभ पर्व)**

महापालिकेच्या सुरक्षेत वाढ आणि कार्यालयीन शिस्त कायम ठेवण्यासाठी प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. आता कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचारी यांना ओळखपत्राशिवाय महापालिका मुख्य इमारतीत प्रवेश देण्यात येणार नाही. "नो आयडी, नो एंट्री" या धोरणाची अंमलबजावणी आजपासून पूर्ण ताकदीने सुरू करण्यात आली आहे.

अलीकडील काही घटनांमुळे महापालिका इमारतीत अनधिकृत व्यक्तींची वर्दळ वाढल्याचे प्रशासनाच्या लक्षात आले होते. सुरक्षेतली ही ढील रोखण्यासाठी आयुक्तांनी तातडीने आदेश जारी केले. प्रवेशद्वारावर अतिरिक्त सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले आहेत.

सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी अधिकृत आयडी कार्ड सोबत ठेवणे अनिवार्य,आयडी कार्ड नसल्यास प्रवेश पूर्णतः बंद. अत्यावश्यक परिस्थितीत तात्पुरता पास देण्याची सीमित व्यवस्था. कुणीच ओळखपत्राशिवाय लिफ्ट, गेट, मुख्य हॉलमध्ये प्रवेश करू शकणार नाही. काही कर्मचाऱ्यांनी हा निर्णय कौतुकास्पद असल्याचे सांगितले. "सुरक्षा वाढणे गरजेचे आहे," अशी प्रतिक्रिया समोर आली.

तर काही कर्मचारी मनमोकळेपणे म्हणाले— "सकाळी घाईत आयडी राहिला तर अडचण होते, कार्यालयात उशीर होतो."

महापालिकेत कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची तपशीलवार नोंद भेटायच्या अधिकाऱ्याचे नाव कारण नोंदवूनच प्रवेश दिला जाणार आहे. कोणतीही व्यक्ती थेट कार्यालयीन विभागांत प्रवेश करू शकणार नाही. आयुक्तांनी स्पष्ट शब्दांत सांगितले— "महापालिकेची सुरक्षितता ही सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे. ओळखपत्राशिवाय प्रवेश नाही—हा नियम कोणासाठीही सैल केला जाणार नाही."

महापालिकेत आता सुरक्षा, शिस्त आणि तपासणी यांचा ताळमेळ अधिक मजबूत केला जात आहे. 'नो आयडी, नो एंट्री' अंमलात आणल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीत शिस्तबद्धता येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## युवक सरचिटणीसपदी अमर बानाईत यांची निवड



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या खडकवासला विधानसभा मतदारसंघात युवक सरचिटणीसपदी अमर बानाईत यांची निवड करण्यात आली आहे. नुकतेच नियुक्तीपत्र मतदार संघाचे युवक अध्यक्ष शरद दबडे, उपाध्यक्ष सुरेश सुमनबाई वैजिनाथ परकड (पाटील) आणि सामाजिक कार्यकर्ते विवेक गायकवाड यांच्या हस्ते देण्यात आले.

आशादायी, सर्वसामान्य कार्यकर्त्याला सरचिटणीसपदी निवड होताच कार्यकर्त्यांमध्ये आनंद आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. समाजासाठी सातत्याने धावणारी त्यांची वृत्ती, लोकांशी असलेला जवळचा संवाद आणि संघर्षातून उभा राहिलेला त्यांचा प्रवास पाहता, अनेकांना त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत.

## भाभीजी घर पर हैं – कॉमेडी व्यक्तिरेखा आता बिग स्क्रीनसाठी सज्ज!


**मुंबई (दै. आरंभ पर्व)**




दहा वर्षांहून अधिक काळापासून झी एंटरटेनमेंटची 'भाभीजी घर पर हैं' ही भारतातील सर्वात लोकप्रिय कॉमेडी मालिका राहिली आहे. या मालिकेने आपल्या लोकप्रिय पात्रांमुळे प्रेक्षकांची मने जिंकली: विभूतीजींचे आकर्षण, तिवारीजींचा ड्रामा, अंगूरी भाभीचे "सही पकडे हैं!", अनीता भाभींची आत्मविश्वासपूर्ण मोहकता आणि हप्पू सिंग व सक्सेना यांचे "आय लाइक इट!" ही अविस्मरणीय धमालीने पिढ्यान् पिढ्या प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. देशातील सर्वात दीर्घकाळ चालणाऱ्या आणि सर्वाधिक आवडत्या टीव्ही शो पैकी एक म्हणून, या मालिकेचे प्रेक्षकांसोबतचं नाते वर्षागणिक अधिकधिक घट्ट होत गेले आहे. भारतीय इतिहासात पहिल्यांदाच, अजूनही सुरू असलेला एक शो मोठ्या पडद्यावर झेप घेत आहे. झी सिनेमा आणि झी स्टुडिओज 'भाभीजी घर पर हैं – फन ऑन द रन' हा चित्रपट 6 फेब्रुवारी 2026 रोजी थिएटर्समध्ये घेऊन येत आहेत. हा चित्रपट या लोकप्रिय व्यक्तिरेखांना मोठ्या पडद्यावर एका धमाल, खळखळून हसवणाऱ्या साहसी प्रवासावर घेऊन जाईल.

## राहुल बाकरे आणि विनित फडणीस यांचा अॅवॉर्ड्सने सन्मान

**पुणे(दै. आरंभ पर्व)**





इन्फोसिसची सामाजिक कार्य सीएसआर शाखा असलेल्या इन्फोसिस फाउंडेशनने आज आरोहण सोशल इनोव्हेशन अवॉर्ड्सच्या चौथ्या आवृत्तीच्या विजेत्यांची घोषणा केली. यंदा शिक्षण, आरोग्यसेवा आणि पर्यावरणीय शाश्वतता या तीन क्षेत्रांमध्ये अपवादात्मक नवसंशोधनांचा गौरव करण्यात आला - तंत्रज्ञान, सर्जनशीलता आणि करुणेद्वारे सामाजिक प्रेरणा देण्याच्या इन्फोसिस फाउंडेशनच्या ध्येयाशी जुळणारी ही तीन क्षेत्रे आहेत. या वेळी २००० हून अधिक प्रवेशिकांमधून विजेत्यांची निवड करण्यात आली. आरोहण सोशल इनोव्हेशन एवॉर्ड्स २०२५ चे विजेत्यांना त्यांच्या प्रभावी नवसंशोधनासाठी प्रत्येकी ५० लाख रूपये देण्यात आले शिक्षण– बेंगळुरू येथील राजेश ए राव, रवींद्र एस राव आणि दीपा एल बी राजीव यांनी 'कनेक्टिंग द डॉट्स' हा एक परस्परसंवादी शिक्षण कार्यक्रम विकसित केला आहे. त्यातून सरकारी शाळांमधील इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दररोज लाईव्ह वर्ग, लॅब किट, शिष्यवृत्ती आणि प्रभावी शिक्षणासाठी शिक्षक प्रशिक्षणाद्वारे स्टेम आणि स्पोकन इंग्लिश शिकवले जाईल. आरोग्यसेवा - नवी दिल्ली येथील चितरंजन सिंह आणि रॉबिन सिंह यांनी 'क्लुइक्स सीओ१२' विकसित केला आहे. तो पोर्टेबल एआय- आणि आयओटी-सक्षम पाणी-गुणवत्ता विश्लेषक असून त्यातून रिअल-टाइम, जीपीएस-टॅग केलेले अहवाल तयार करतो. ते ३० मिनिटांत पाण्यामुळे होणारे रोग ओळखण्यासाठी १४ प्रमुख पॅरामीटर्सची चाचणी करते. त्यामुळे शहरी आणि ग्रामीण दोन्ही वर्गात विश्वसनीय जल चाचणी परवडणारी, सुलभ आणि शाश्वत बनते. पर्यावरणीय शाश्वतता - पुण्यातील राहुल सुरेश बाकरे आणि विनित मोरेश्वर फडणीस यांनी 'बोरचार्जर' विकसित केले.

हे जगातील पहिले रोबोटिक कृत्रिम बोअरवेल-रिचार्ज तंत्र असून ते दरवर्षी ४ ते ८० लाख लिटर पावसाचे पाणी विद्यमान बोअरवेलमध्ये साठवू शकते – त्यामुळे सिंचन, शेती उत्पादन आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता आणि प्रमाण सुधारते – राहणीमान अधिक शाश्वत बनवते.

# वांजळे पुलाखालील पार्किंग पुन्हा सुरू करा

- वृत्तपत्र विक्रेत्यांची मागणी
- कचरा, दुर्गंधी आणि उघडा महावितरण डीपी; आंदोलनाचा निलेश दमिष्टे यांचा इशारा



**धायरी(दै. आरंभ पर्व)**

धायरी फाटा जवळील वांजळे पुलाखालील पार्किंग अनेक वर्षांपासून वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी सकाळच्या कामाचे महत्त्वाचे ठिकाण होते. पेपर वर्गीकरण, बंडल तयार करणे आणि विविध भागात वितरण करण्यासाठी ही जागा सोयीची होती. मात्र काही दिवसांपूर्वी हे पार्किंग अचानक बंद करण्यात आले आहे. पार्किंग बंद झाल्याने वृत्तपत्र विक्रेत्यांना आता प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. जागा नसल्याने पहाटेपासून त्यांचे काम अडथळ्यांतून चालू आहे.

याठिकाणी सध्या परिस्थिती खूपच खराब आहे. पार्किंगच्या ठिकाणी सर्वत्र कचरा पसरलेला आहे. दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे तिथे उभे राहणेही कठीण झाले आहे. आणखी एक गंभीर बाब म्हणजे तिथे असलेला महावितरणचा इलेक्ट्रिकल डीपी पूर्णपणे उघडा आहे. हा डीपी उघडा असल्यामुळे कोणत्याही क्षणी अपघात होऊ शकतो. तिथून रोज जाणारे नागरिक, विशेषतः पहाटे काम करणारे वृत्तपत्र विक्रेते, यांच्यावर मोठा धोका निर्माण झाला आहे. या सर्व गंभीर परिस्थितीची पाहणी केल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे नेते निलेश सुरेखा रमेश दमिष्टे यांनी प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, "वृत्तपत्र विक्रेते रोज पहाटेपासून कष्ट करून आपल्यापर्यंत बातम्या पोहोचवतात. पण त्यांना अत्यंत अस्वच्छ आणि धोकादायक ठिकाणी काम करावे लागत आहे. हे चुकीचे आहे."

दमिष्टे यांनी प्रशासनाला स्पष्ट मागणी केली की— "वांजळे पुलाखालील पार्किंग तात्काळ सुरू करा. कचरा हटवा, परिसर स्वच्छ करा आणि महावितरणचा डीपी सुरक्षित करा. अन्यथा आम्ही आंदोलन करू."

तसेच त्यांनी प्रशासनाला १० दिवसांची मुदत दिली आहे. या कालावधीत परिस्थितीत बदल न झाल्यास ते तीव्र आंदोलन छेडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वृत्तपत्र विक्रेत्यांनीही सांगितले की सध्याच्या परिस्थितीमुळे त्यांचे रोजचे काम खूप अवघड झाले आहे. स्वच्छता, सुरक्षा आणि पार्किंगची सुविधा तातडीने पुरवण्याची सर्वांची एकमुखी मागणी आहे.